७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

सोमवार, दि. ०८ जून २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : १६३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# आरोग्य सेवांचे जाळे अधिक मजबूत करणार

**मुख्यमंत्री : नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांत 'उडान' प्रकल्पाला पाच वर्षांची मुदतवाढ; मानसिक आरोग्य सेवांसाठी स्वयंसेवी संस्थांशी सामंजस्य करारास मंजुरी**

मुंबई (दै. संध्या)



राज्यातील ग्रामीण आणि आदिवासी भागांपर्यंत मानसिक आरोग्य सेवा प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले असून, नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये 'उडान' प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य सेवा अधिक बळकट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारने सार्वजनिक आरोग्य विभाग आणि दोन स्वयंसेवी संस्थांमध्ये पाच वर्षांसाठी सामंजस्य करार करण्यास मंजुरी दिली आहे.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार, ग्रामीण आदिवासी समाज विकास संस्था, सौसर (मध्य प्रदेश) आणि अन्यथा फाउंडेशन या संस्थांच्या सहकार्याने जिल्हा मानसिक आरोग्य कार्यक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. हा करार १ ऑगस्ट २०२६ ते ३१ जुलै २०३१ या कालावधीसाठी लागू राहणार असून, तो पूर्णपणे गैरवित्तीय स्वरूपाचा असल्याने राज्य शासनावर कोणताही आर्थिक भार पडणार नाही.

राज्यात मानसिक आरोग्याच्या समस्या वाढत्या प्रमाणात समोर येत असल्याच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मेंदू विज्ञान संस्थेच्या सर्वेक्षणानुसार देशातील सुमारे १० ते १४ टक्के प्रौढ व्यक्तींना मानसिक आरोग्याचे विकार आहेत. महाराष्ट्राची लोकसंख्या लक्षात घेता सुमारे १.२ ते १.८ कोटी नागरिक मानसिक समस्यांशी झुंज देत असल्याचे या सर्वेक्षणात नमूद करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यात आरोग्य सेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यावर भर देत मानसिक आरोग्याला प्राधान्य देण्याचे धोरण स्वीकारले आहे. ग्रामीण भागात मानसिक आरोग्य सेवा अधिक परिणामकारकपणे उपलब्ध व्हाव्यात यासाठी 'उडान' प्रकल्पाचा विस्तार करण्यात येत आहे.

या प्रकल्पांतर्गत गावपातळीवर मानसिक आरोग्य जनजागृती मोहीम राबविण्यात येणार असून ग्रामपंचायत, बचत गट, युवक गट यांचा सहभाग वाढविला जाणार आहे; तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर मानसिक आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे, मनुष्यबळ प्रशिक्षण, मातृ मानसिक आरोग्य कार्यक्रम राबविणे, तसेच सौम्य आणि मध्यम स्वरूपाच्या रुग्णांना मानसोपचार व समुपदेशन सेवा देण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे.

याआधी नागपूर जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या 'उडान' प्रकल्पाला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्यानंतर आता वर्धा जिल्ह्यातही हा कार्यक्रम विस्तारित करण्यात येत आहे. यामुळे ग्रामीण आणि आदिवासी भागातील नागरिकांना मानसिक आरोग्य उपचार आणि समुपदेशन सेवा स्थानिक स्तरावर उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाने या करारासाठी आरोग्य सेवा संचालकांना अधिकृत केले असून, मानसिक आरोग्य क्षेत्रात शासन आणि स्वयंसेवी संस्थांमधील समन्वयातून राज्यातील आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न आहे.

## देशात ड्रग्जविरोधी मोहीम सुरू, पाळेमुळे खणून काढणार

मुंबई (दै. संध्या)



अल निनोमुळे यंदा राज्यात कमी पावसाची शक्यता - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

"राज्यात आणि देशात सध्या अंमली पदार्थांविरोधात 'नो टॉलरन्स फॉर ड्रग्ज' ही मोहीम तीव्र गतीने राबवली जात आहे. विविध तपास यंत्रणांच्या माध्यमातून चोख माहिती गोळा करून मोठ्या कारवाया केल्या जात असून, कुठल्याही परिस्थितीत ड्रग्जच्या काळ्या जाळ्याची पाळेमुळे खणून काढली जातील," अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. आगामी काळातही या कारवाया सातत्याने सुरूच राहतील, असा इशारा त्यांनी अंमली पदार्थ तस्करांना दिला आहे. ते मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यंदाच्या मान्सूनबाबत आणि हवामानाच्या स्थितीवर बोलताना मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या चिंतेची दखल घेतली. ते म्हणाले, यंदाचे वर्ष 'अलनिनो'चे असल्याने सरासरी पाऊस ९२ टक्के राहण्याचा अंदाज आहे. सरासरी ९२ टक्के पाऊस असला, तरी मराठवाडा, पश्चिम विदर्भ, उत्तर महाराष्ट्राचे काही जिल्हे आणि राज्यातील आवर्षण प्रवण (दुष्काळी) भागांमध्ये या सरासरीपेक्षाही कमी पाऊस पडण्याची दाट शक्यता आहे. कमी पावसाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांवर दुबार पेरणीची वेळ येऊ नये, यासाठी त्यांनी योग्य वेळीच पेरणी करावी, असे आवाहन सातत्याने केले जात आहे. कमीत कमी पावसात शेतकऱ्यांचे जास्तीत जास्त नुकसान कसे टाळता येईल, यासाठी सरकार सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देशात नव्याने येत असलेल्या 'ई-८५' (E-85) या पर्यावरणपूरक इंधनाबाबत मुख्यमंत्र्यांनी मोठी आशा व्यक्त केली. "या नव्या इंधनाचा देशात सर्वाधिक फायदा महाराष्ट्राला होणार आहे.


क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com


## घरगुती LPG सिलिंडर ₹29 ने महागला

### ३ महिन्यांत दुसऱ्यांदा किमतीत वाढ

नवी दिल्ली (दै. संध्या)



₹89ने दर वाढले; मुंबईत 14.2 किलोचा सिलिंडर ₹941 मध्ये

घरगुती एलपीजी सिलिंडर 29 रुपयांनी महागला आहे. नवीन दर आज रात्री 12 वाजल्यापासून लागू झाले आहेत. दिल्लीत आता 14.2 किलो वजनाच्या गॅस सिलिंडरची किंमत ₹913 वरून ₹942 होईल. तीन महिन्यांत दुसऱ्यांदा एलपीजीच्या किमती वाढवण्यात आल्या आहेत. यापूर्वी 7 मार्च रोजी एलपीजी सिलिंडरचे दर ₹60 ने वाढवण्यात आले होते. अशा प्रकारे 3 महिन्यांच्या आत घरगुती सिलिंडर 89 रुपयांनी महागला आहे. न्यूज एजन्सी पीटीआयच्या सूत्रांनुसार, तेल कंपन्यांचे म्हणणे आहे की, आंतरराष्ट्रीय बाजारात वाढलेल्या ऊर्जा खर्चांमुळे आणि घरगुती विक्रीवरील नुकसानीमुळे किमती वाढवाव्या लागल्या आहेत. कंपन्यांना प्रति सिलेंडर ₹703 तोट्याचा दावा न्यूज एजन्सी पीटीआयने सूत्रांच्या हवाल्याने सांगितले की, सरकारी तेल कंपन्यांना प्रत्येक घरगुती सिलिंडरवर सुमारे ₹703 चे नुकसान होत होते. किंमती वाढूनही केवळ अंशतः भरपाई होईल. 2026 पूर्वी सरकारने 8 एप्रिल 2025 रोजी घरगुती एलपीजी सिलिंडरच्या दरात ₹50 ची वाढ केली होती. 1 मार्च 2026 रोजी व्यावसायिक गॅस सिलिंडरचे दर ₹31 पर्यंत वाढवण्यात आले होते. 5 किलोग्राम वजनाच्या एलपीजी सिलिंडरच्या किमतीतही ₹11 ची वाढ करण्यात आली होती, ज्यामुळे त्याची किंमत ₹821.50 झाली. गेल्या काही आठवड्यांत पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीचे दरही वाढले आहेत.

मे महिन्यात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती एकूण ₹7.50 प्रति लिटरने वाढल्या आहेत, तर सीएनजी सुमारे ₹6 प्रति किलोने महाग झाली आहे. कंपन्यांना पेट्रोलवर सुमारे ₹11 प्रति लिटर आणि डिझेलवर ₹33.6 प्रति लिटरचे नुकसान होत आहे. याउपरही कंपन्यांचा दावा आहे की पेट्रोल-डिझेल अजूनही उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीत विकले जात आहे. सरकारचे म्हणणे आहे की जागतिक किमतींमध्ये झालेल्या संपूर्ण वाढीचा भार ग्राहकांवर टाकण्यात आलेला नाही.

## टप्प्या टप्प्याने महागाईचा धक्का देण्याचे सरकारचे सूत्र

*घरगुती गॅस दरवाढीवरून शरद पवारांचा पंतप्रधान मोदींवर घणाघात, दिला मोठा इशारा*

**दिल्ली-मुंबईत नवे दर लागू; तीन महिन्यांत दुसरी मोठी वाढ**



पुणे (दै. संध्या)

देशभरात दैनंदिन वापरातील आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमती आधीच गगनाला भिडलेल्या असताना, केंद्र सरकारने सर्वसामान्य जनतेला महागाईचा आणखी एक तीव्र झटका दिला आहे. घरगुती वापराच्या एलपीजी गॅस सिलिंडरच्या दरात थेट २९ रुपयांची वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे सामान्य नागरिकांच्या किचनचे बजेट पूर्णपणे कोलमडणार आहे. केंद्राच्या या धोरणावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी कडाडून टीका केली असून, सत्ताधाऱ्यांना याची राजकीय किंमत मोजावी लागेल, असा इशारा दिला आहे.

या दरवाढीवर आपली पहिली प्रतिक्रिया देताना ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आर्थिक धोरणांवर निशाणा साधला. ते म्हणाले, "हे असंच चालणार, हे दर सातत्याने वाढवले जात आहेत. या वाढत्या महागाईचा थेट परिणाम आज सामान्य माणसाच्या संसारावर होत आहे. पंतप्रधानांनी सुरुवातीला आम्ही महागाई नियंत्रित करत असल्याचे सांगितले होते. पण, 'नियंत्रित' करणे याचा अर्थ जनतेला टप्प्याटप्प्याने महागाईचे धक्के देणे, हेच त्यांचे सूत्र बनले आहे. या निर्णयांची राजकीय किंमत सत्ताधाऱ्यांना योग्य वेळी नक्कीच कळेल."

ही दरवाढ १४.२ किलोच्या घरगुती सिलिंडरवर करण्यात आली असून, गेल्या तीन महिन्यांतील ही दुसरी मोठी वाढ आहे. यापूर्वी ७ मार्च रोजी सिलिंडर थेट ६० रुपयांनी महागला होता. नव्या दरवाढीनुसार प्रमुख शहरांतील किंमती पुढीलप्रमाणे आहेत. मुंबईमध्ये आधीचा दर ९१२.५० रुपये होता, तो आता ९४१.५० रुपयांवर पोहोचला आहे. तर राजधानी दिल्लीत गॅस सिलिंडर ९१३ रुपयांवरून थेट ९४२ रुपयांवर गेला आहे.

घरगुती गॅससोबतच व्यावसायिक सिलिंडरच्या दरानेही उच्चांक गाठला आहे. १ जून रोजी पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक गॅसच्या दरात ४२ रुपयांची वाढ केली होती.

धक्कादायक बाब म्हणजे गेल्या पाच महिन्यांत १९ किलोच्या कमर्शियल सिलिंडरचे दर तब्बल दुप्पट झाले आहेत. १ जानेवारीपूर्वी या सिलिंडरचा दर १५८० रुपये होता. १ जून रोजी हाच दर थेट ३,११३.५० रुपयांवर जाऊन पोहोचला आहे.

**आगामी काळात दर आणखी वाढण्याची भीती**

पेट्रोल-डिझेल आणि गॅसच्या वाढत्या किमतींमुळे नागरिक आधीच मेटाकुटीला आले आहेत. त्यातच एलपीजी गॅसचे उत्पादन करणाऱ्या सरकारी तेल कंपन्यांना अजूनही प्रत्येक घरगुती सिलिंडरमागे सुमारे ७०३ रुपयांचा तोटा सहन करावा लागत असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे आगामी काळात गॅस आणखी महागण्याची भीती बाजार तज्ज्ञांकडून वर्तवली जात आहे.

**ढिंग-टांग**




## पुतण्या समीरला येवल्यातून विधानसभेची उमेदवारी आणि कॅबिनेट मंत्रिपदही हवे

# खासदारपदासाठी छगन भुजबळांच्या अटी-शर्ती

मुंबई (दै. संध्या)



राष्ट्रवादी अजित पवार गटातर्फे एकाला राज्यसभेवर जाण्याची संधी आहे. या जागेवर अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दावा केला आहे. मात्र, खासदारकीसोबत दोन अटी पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांपुढे घातल्या आहेत. त्यातील एक अट म्हणजे त्यांच्या रिक्त होणाऱ्या विधानसभेतील येवला मतदारसंघाची जेव्हा पोटनिवडणूक होईल तेव्हा त्यांचा पुतण्या समीर भुजबळ यालाच पक्षातर्फे उमेदवारी मिळाली पाहिजे.

दुसरी अट म्हणजे निवडून आल्यावर समीर यांना महाराष्ट्रात कॅबिनेट मंत्रिपदही मिळालेच पाहिजे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची मुलगी मंत्री आहे. मुलगा आता आमदार झाला आहे. त्यांच्या एकाच घरात तिघांना संधी, मग माझ्या कुटुंबावरच अन्याय का, असा त्यांचा सवाल आहे. भुजबळांच्या या पवित्र्याने अजित पवार गटात एकच गडबड उडाली. शनिवारी आधी भुजबळांच्या निवासस्थानी वरिष्ठ नेत्यांची बैठक झाली. त्यानंतर दुसरी बैठक प्रफुल्ल पटेल यांच्या निवासस्थानी झाली. दोन-दोन तास चाललेल्या या बैठकांतून अंतिम निर्णय झाला नाही. तो रविवारी होऊ शकतो.

मात्र, सूत्रांनी सांगितले की, अमरावतीच्या माजी खासदार नवनीत राणाही राष्ट्रवादीकडून उमेदवारीसाठी प्रयत्नशील होत्या. प्रमोद हिंदुराव, अविनाश आदिक आणि समीर भुजबळ यांचेही नाव चर्चेत आहे. मात्र छगन भुजबळ महाराष्ट्रात राहून वारंवार नेतृत्वाला आव्हान देऊ शकतात. म्हणून त्यांना दिल्लीत राज्यसभेवर पाठवले जाण्याची दाट शक्यता आहे.

उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ८ जूनपर्यंत मुदत आहे. ७ जून रोजी कोणत्याही क्षणी उमेदवाराच्या नावाची घोषणा होऊ शकते. उमेदवाराबाबतचा अंतिम निर्णय घेण्यासाठी शनिवारी भुजबळांच्या निवासस्थानी झालेल्या पहिल्या बैठकीस सुनेत्रा पवार, सुनील तटकरे, दिलीप वळसे पाटील उपस्थित होते. त्यात केवळ नावच नाही, तर विधानसभेतील जागांचे गणित आणि राजकीय पुनर्वसनावरही सविस्तर चर्चा झाल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. या बैठकीनंतर राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा निवासस्थानी भेट घेतली. महायुतीमधील जागावाटप आणि पाठिंब्याबाबतची अंतिम भूमिका स्पष्ट करण्यासाठी ही भेट अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

विधान परिषद निवडणुकीत मोठ्या प्रमाणात घोडेबाजार झाल्याचा आरोप सुप्रिया सुळेंनी केला. या प्रकाराला आळा घालण्यासाठी लोकसभेत विधेयक आणू, असेही त्या म्हणाल्या. संजय राऊत यांनी १५० कोटींचा व्यवहार झाल्याचे म्हटले. काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात म्हणाले की, भाजपने लोकशाहीचा खून केला. त्यावर फडणवीस म्हणाले की, माणसं पैशांपेक्षा प्रेमानं जिंकता येतात हे समजलं तर अशा प्रकारचं विधेयक आणण्याची गरजच पडणार नाही, असे ते म्हणाले. मात्र, निवडणूक प्रक्रियेत सुधारणा व्हायला हव्यात. या संदर्भात कुणी विधेयक आणत असेल तर त्याला आपला विरोध नाही. निवडणूक व्यवस्थेत आवश्यक बदल झाले पाहिजेत.

**तीव्र इच्छेपोटी भुजबळ दिल्लीत जाण्यास तयार**

सूत्रांनी सांगितले की, छगन भुजबळ यांची प्रतिमा महाराष्ट्रातील ओबीसींचे नेते अशी झाली आहे. राज्यसभेत जाऊन ही प्रतिमा त्यांना राष्ट्रीय पातळीवर नेण्याची तीव्र इच्छा आहे. मात्र, राज्यातील राजकारणात अप्रत्यक्ष सहभागही हवा आहे. दुसरीकडे महाराष्ट्रातील बदलती राजकीय, सामाजिक समीकरणे पाहता भुजबळ दिल्लीत गेलेले बरे, अशी भावना राष्ट्रवादीतील तरुण नेते व्यक्त करत आहेत. सूत्रांचे असेही म्हणणे आहे की, नवनीत राणांनी भाजपसोबतच राहणार अशी भूमिका घेतल्याने त्यांना संधी मिळणार नाही.

## पुण्यात मध्यरात्री रेव्ह पार्टीवर पोलिसांचा छापा

**१०० हून अधिक तरुण-तरुणी ताब्यात; लाखो रुपयांचे मद्य, तंबाखूजन्य पदार्थ, गांजा जप्त**

पुणे (दै. संध्या)




पुण्यात गेल्या काही दिवसांपासून रेव्ह पार्टीचा मुद्दा प्रचंड गाजत असतानाच, आता पुणे पोलिसांनी मध्यरात्री एका आलिशान बंगल्यात सुरू असलेल्या कथित रेव्ह पार्टीवर छापा टाकून मोठी कारवाई केली आहे. पुणे जिल्हा अंतर्गत येणाऱ्या तुळापूर गावच्या हद्दीत ही कारवाई करण्यात आली. गुन्हे शाखेने टाकलेल्या या छाप्यात सुमारे १०० हून अधिक तरुण-तरुणींना ताब्यात घेण्यात आले असून, यामध्ये अनेक अल्पवयीन मुला-मुलींचा समावेश असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

या कारवाईबाबत पुण्याच्या अप्पर पोलिस आयुक्त तेजस्विनी सातपुते यांनी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, लोणीकंद पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तुळापूर परिसरात एका आलिशान बंगल्यात ही पार्टी आयोजित करण्यात आली होती. आयोजकांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दुपारी १ ते रात्री ११.३० वाजेपर्यंतची तात्पुरती परवानगी घेतली होती. मात्र, ही मुदत संपल्यानंतरही कोणतीही कायदेशीर परवानगी न घेता मध्यरात्री उशिरापर्यंत ही पार्टी जोरात सुरू होती. गुन्हे शाखेच्या पथकाने मध्यरात्री जेव्हा या बंगल्यात प्रवेश केला, तेव्हा तिथे उपस्थित असलेले बहुतांश तरुण-तरुणी अंमली पदार्थांच्या आणि दारूच्या नशेत पूर्णपणे धुंद होते. पोलिसांनी तातडीने या सर्वांना ताब्यात घेतले. घटनास्थळावरून पोलिसांनी लाखो रुपयांचा विदेशी मद्याचा साठा, तंबाखूजन्य पदार्थ आणि गांजा जप्त केला आहे.

अप्पर पोलिस आयुक्त सातपुते यांनी पुढे सांगितले की, "पार्टीमध्ये सहभागी झालेले अनेक तरुण हे २१ वर्षांच्या आतील असण्याची दाट शक्यता आहे. या आयोजकांनी नियमांचे कशा प्रकारे उल्लंघन केले? याचा तपास केला जात असून त्यानुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. ज्या व्यक्तीने हा बंगला या पार्टीसाठी उपलब्ध करून दिला, त्याचा या गुन्ह्यात काही सहभाग आहे का? याचीही पडताळणी केली जात आहे."

**तरुणाई कुठून आली? तपास सुरू**

या रेव्ह पार्टीत पकडण्यात आलेले तरुण-तरुणी नेमके पुण्याच्या कोणत्या भागातून अथवा इतर शहरांतून आले होते, याचा शोध लोणीकंद पोलिस आणि गुन्हे शाखा घेत आहे. सर्व संशयितांची पोलिसांकडून कसून चौकशी केली जात असून, वैद्यकीय तपासणीनंतर पुढील कायदेशीर पावले उचलली जाणार आहेत. या कारवाईमुळे पुणे आणि परिसरातील बेकायदेशीर पार्टी संस्कृतीवर पुन्हा एकदा मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

## संपादकीय

# एआयचा गैरवापर-अभिनेत्याचं करिअर बरबाद!

दक्षिण कोरियाचा लोकप्रिय अभिनेता किम सू-ह्यून (Kim Soo-hyun) हा 'के-ड्रामा' जगतातील सर्वांत यशस्वी आणि प्रभावशाली कलाकारांपैकी एक मानला जातो. रोमँटिक, ऐतिहासिक, भावनिक आणि थ्रिलर अशा विविध प्रकारच्या भूमिका साकारून त्यानं जागतिक लोकप्रियता मिळवली. तो 'Hallyu' म्हणजेच 'कोरियन वेव्ह'चा महत्त्वाचा चेहरा मानला जातो. आपल्या अदाकारीमुळे दक्षिण कोरियात तो चांगलाच प्रसिद्ध आहे. पण, गेल्या काही काळापासून तो एका वेगळ्याच कारणानं गाजतो आहे. अभिनेत्री किम से-रॉन (Kim Sae-ron) हीदेखील दक्षिण कोरियाची अत्यंत प्रतिभावान अभिनेत्री. बालकलाकार म्हणून सुरुवात करून अतिशय कमी वयातच कोरियन चित्रपटसृष्टीत आणि अगदी अंतरराष्ट्रीय स्तरावरही तिनं मोठं नाव कमावलं. परंतु, गेल्यावर्षी फेब्रुवारीत वयाच्या केवळ २४व्या वर्षी तिनं आत्महत्या केली. तिच्या निधनानं कोरियन मनोरंजनसृष्टीला मोठा धक्का बसला. पण, तिच्याच नावावरून आणि एआयचा वापर करून एका यूट्यूबरनं अभिनेता किम सू-ह्यूनला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. इतका की, अभिनेता किमच्या लोकप्रियतेला त्यामुळे ओहोटी लागली, त्याच्या कारकिर्दीला मोठा फटका बसला आणि स्वत: किमदेखील त्यामुळे नैराश्यात गेला.

'होव्हर लॅब' हे लोकप्रिय यूट्यूब चॅनल चालवणाऱ्या किम से-उई यानं एआयचा वापर करून आणि पुराव्यांमध्ये फेरफार करून लोकांसमोर एक वेगळंच चित्र उभं केलं. लोकांचाही त्यावर विश्वास बसला. अभिनेता किम सू-ह्यूननं या अभिनेत्रीशी ती अल्पवयीन असतानाच संबंध ठेवले होते, असा खोटा दावा केल्याचा आरोप पोलिस आणि सरकारी वकिलांनी केला आहे. अभिनेत्री किम से-रॉननं आत्महत्या केल्यानंतर काही काळातच हे प्रकरण चर्चेत आलं. तिच्या मृत्यूनंतर काही महिन्यांनी जवळपास दहा लाख सदस्य असलेल्या 'होव्हर लॅब' चॅनलनं एक व्हॉइस रेकॉर्डिंग प्रसिद्ध केलं. त्यात अभिनेत्री म्हणते आहे, मी माध्यमिक शाळेत असल्यापासूनच अभिनेता किम सू-ह्यूनला डेट करते आहे. मात्र, हे व्हॉइस रेकॉर्डिंग एआयच्या मदतीनं तयार करण्यात आल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे.

अभिनेत्रीच्या फोनमधून पाठवण्यात आलेल्या मजकूर संदेशांचे स्क्रीनशॉट्सही फेरफार करून ते किम सू-ह्यूनशी झालेल्या संभाषणासारखे दाखवण्यात आल्याचा आरोप यूट्यूबरवर आहे. 'होव्हर लॅब' हे दक्षिण कोरियातील वादग्रस्त चॅनल मानलं जातं. या चॅनलवर राजकारण आणि मनोरंजन क्षेत्रावरील भाष्य नियमितपणे प्रसिद्ध केलं जातं. सेलिब्रिटींबाबतच्या चर्चांसाठीही हे चॅनल लोकप्रिय आहे. 'होव्हर लॅब'वरील दाव्यांमुळे 'किम सू-ह्यून'चा सामाजिक पाया आणि आर्थिक व्यवहार पूर्णपणे कोलमडले, तसेच त्याच्या व्यावसायिक अस्तित्वाचा पायाही उद्ध्वस्त झाला', असं 'जुंगआंग इल्बो'नं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे. या आरोपांमुळे धक्का बसलेला अभिनेता अजूनही मानसिक आरोग्यासाठी उपचार घेत असल्याचं पोलिसांचं म्हणणं आहे. मार्च २०२५मध्ये घेतलेल्या भावनिक पत्रकार परिषदेनंतर अभिनेत्यानं आजपर्यंत अधिकृत सार्वजनिक उपस्थिती लावलेली नाही.




## संस्कृत सुभाषित

श्रेयः पुष्पफलं वृक्षाद्,दध्नःश्रेयो घृतंस्मृतम्।
श्रेयस्तैलंच पिण्याकाच्छ्रेयान् धर्मस्तु मानुषात।।

अर्थ – वृक्षापासून फुले व फळे मिळावीत अशी अपेक्षा असते. दह्यापासून तूप मिळावे अशी अपेक्षा असते तर माणसाकडून धर्माचरणाची अपेक्षा असते.

## आगामी साप्ताहिकी

८ जून २०२६ सोमवार
कालाष्टमी
सूर्या मृगशीर्ष नक्षत्रप्रवेश वाहन: बेडूृ
९ जून २०२६ मंगळवार
१० जून २०२६ बुधवार
जागतिक दृष्टिदान दिन
११ जून २०२६ गुरुवार
कमला एकादशी
पारशी बेहमन मासारंभ
१२ ऑगस्ट २०२६ शुक्रवार
प्रदोष
१३ जून २०२६ शनिवार
शिवरात्री
१४ जून २०२६ रविवार
दर्श अमावास्या
अमवास्या प्रारंभ दुपारी १२.२०

## उपदेशकथा

### रामकृष्णांची परीक्षा

रामकृष्ण परमहंस हे अगदी शुद्ध मनाचे सत्पुरुष होते. त्यांना कशाचाही मोह नव्हता की आसक्ती नव्हती. पैशाला तर ते स्पर्शही करीत नसत त्यामुळे शिष्यांच्या मनात त्यांच्याविषयी आदर होता पण तरीही ते सांगत, 'गुरुविषयी आंधळी श्रद्धा मनात ठेवू नये. सावकार प्रत्येक नाणं खणखण वाजवून खरं आहे की नाही हे तपासून घेतो. तसंच आपण गुरु खरा आहे की खोटा हे तपासून घ्यावं.' एकदा नरेंद्राने त्यांची अशी परीक्षा घ्यायचे ठरवले. ते स्नानाला गेलेले असताना त्याने त्यांच्या बैठकीखाली रुपयाचे एक नाणे ठेवून दिले. थोड्या वेळाने रामकृष्ण परत आले आणि बैठकीवर बसले पण बसता क्षणी जणू एखादा विंचू चावावा तसे ताडकन् उठले. बैठकीची चादर बाजूला करून त्यांनी पाहिले तो तेथे रुपया ठेवलेला. त्यांना फार धक्का बसला आणि ते अस्वस्थ झाले. 'कुणी ठेवला हा रुपया येथे?' त्यांनी विचारले. नरेंद्र जवळच उभा होता. त्याने रामकृष्णांची क्षमा मागितली आणि म्हणाला, 'आपल्या मनात पैशाविषयीची आसक्ती अजिबात नाही, असं आपण नेहमी म्हणता. आपली तशी परीक्षा घ्यावी म्हणून मीच हा रुपया ठेवला होता. क्षमा करा मला !' रामकृष्ण म्हणाले, 'क्षमा कशाला मागतोस? तू काहीही चूक केली नाहीस. गुरुला गुरु म्हणून स्वीकारण्यापूर्वी त्याची अशी परीक्षा अवश्य घेतली पाहिजे. आपली निष्ठा अशीच सत्यावर असली पाहिजे. गुरुच्या शब्दांवर नाही! या घटनेमुळे राम कृष्णांचे नरेंद्रावरचे प्रेम वाढीला लागले आणि नरेंद्राची गुरुनिष्ठाही !

कथा उपदेश : आपण गुरू निवडताना तो खरा आहे की खोटा हे तपासून घ्यावे.

## सुविचार

भीती जवळ येताच तिच्यावर हल्ला करा आणि तिचा नायनाट करा.

– चाणक्य

## पंचांग

पंचांग
८ जून २०२६
सोमवार
विक्रम संवत्– २०८२
अधिक ज्येष्ठशके
संवत्– १९४८
संवत्सर –पराभवनाम
अयन– उत्तरायणारंभ
मास–अधिक ज्येष्ठ
ऋतु– सौर ग्रीष्म
कृष्ण पक्ष
तिथि:अष्टमी
२७:२३:५८+
नक्षत्र:शतभिषा
०९:०९:३६
योग:विष्कुम्भ ०९:२७:३७
करण:बालव १५:३०:१६
करण:कौलव
२७:२३:५८+
सूर्य:वृषभ
चन्द्र:कुम्भ
हिजरी सन् – १४४७
मुस्लिम मास – जिल्हेज
तारीख – २२
विशेष
कालाष्टमी
सूर्या मृगशीर्ष नक्षत्रप्रवेश
वाहन: बेडू

## दै.'संध्या' धमाल सूडोकु क्र. ९७३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 7 | | | | | 4 | | |
| | | | | | 5 | | 6 | 1 |
| 5 | 4 | | 3 | | | | | 9 |
| 8 | | 1 | | 6 | 7 | 5 | 4 | |
| 7 | | | 5 | 3 | 9 | | | 2 |
| | 5 | 2 | 8 | 4 | | 6 | | 7 |
| 2 | | | | | 4 | | 7 | 5 |
| 4 | 8 | | 1 | | | | | |
| | | 5 | | | | | 8 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

### सूडोकु क्र. ९७२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 7 | 6 | 3 | 4 | 5 | 1 | 2 | 9 |
| 3 | 4 | 1 | 6 | 2 | 9 | 7 | 5 | 8 |
| 5 | 9 | 2 | 7 | 8 | 1 | 6 | 3 | 4 |
| 1 | 6 | 4 | 9 | 3 | 8 | 2 | 7 | 5 |
| 9 | 5 | 8 | 1 | 7 | 2 | 3 | 4 | 6 |
| 2 | 3 | 7 | 5 | 6 | 4 | 8 | 9 | 1 |
| 7 | 8 | 9 | 4 | 1 | 3 | 5 | 6 | 2 |
| 6 | 2 | 5 | 8 | 9 | 7 | 4 | 1 | 3 |
| 4 | 1 | 3 | 2 | 5 | 6 | 9 | 8 | 7 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- ६८ – रोमन सेनेटने गॅल्बाची रोमन सम्राटपदी निवड केली.
- ५३६ – संत सिल्व्हेरियस पोपपदी.
- ७९३ – इंग्लंडवरील व्हाइकिंग टोळ्यांच्या हल्ल्यांची पहिली नोंद.
- १६२४ – पेरूमध्ये भूकंप.
- १७८३ – आइसलंडमधील लाकी ज्वालामुखीचा उद्रेक. ९,००० ठार, पुढील ७ वर्षे दुष्काळ.
- १७८९ – अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष जेम्स मॅडिसनने नागरिकांच्या हक्कनाम्याचा मसुदा अमेरिकन संसदेत माडला.

### राष्ट्रीय

- १९१५ – लोकमान्य टिळकांच्या 'गीतारहस्य' या मंडालेच्या तुरुंगात लिहिलेल्या ग्रंथाचे पुण्यात प्रकाशन.

### जन्म

- १९१० – दिनकर केशव बेडेकर, मराठी तत्वचिंतक, समीक्षकाचा जन्म.
- १९१७ – गजाननराव वाटवे, भावगीत गायक आणि संगीतकाराचा जन्म.
- १९२१ – सुहार्तो, इंडोशियाचा राष्ट्राध्यक्षाचा जन्म.

### निधन

- ०२१८ – मॅक्रिनस, रोमन सम्राटचे निधन.
- ०६३२ – मोहम्मद पैगंबर, ईस्लामचे संस्थापक यांचे निधन.
- १०४२ – हार्थाकॅन्युट, इंग्लंडचा राजाचे निधन.
- १५०५ – हाँग्झी, चीनी सम्राटचे निधन.
- १७९५ – लुई सतरावा, फ्रांसचा राजाचे निधन.
- १८४५ – अँड्रु जॅक्सन, अमेरिकेचा सातवा राष्ट्राध्यक्षाचे निधन.
- १९२४ – जॉर्ज मॅलोरी, इंग्लिश गिर्यारोहकाचे निधन.
- १९२४ – अँड्रु अर्व्हाइन, इंग्लिश गिर्यारोहकाचे निधन.

## : SMS :

Effect of Generation Gap:
Teacher: Who was Mahatma Gandhi?
Student: He was one of the Great Hero who, Helped Munna Bhai to Impress his Girlfriend.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३९.४ | ३० |
| अहमदनगर | ३९.२ | २६.२ |
| अकोला | ४४.४ | ३३.२ |
| अमरावती | ४२.७ | ३१.१ |
| बीड | ४४.४ | ३२.४ |
| भंडारा | ४३.७ | ३१.९ |
| बुलढाणा | ४२.१ | २८.३ |
| चंद्रपूर | ४४.१ | ३३.२ |
| चेन्नई | ४३.७ | ३२.५ |
| नवी दिल्ली | ४२.३ | ३१.२ |
| धुळे | ४४.१ | ३०.४ |
| गोंदिया | ४१.१ | ३०.६ |
| जळगाव | ४४.९ | ३२.७ |
| कोल्हापूर | ३६.८ | २३.९ |
| लातूर | ३९ | २५.३ |
| मुंबई | ४१.३ | ३५.९ |
| नागपूर | ४२.७ | ३०.५ |
| नांदेड | ४३.५ | ३०.८ |
| नंदूरबार | ४१.१ | ३०.१ |
| नाशिक | ३८.२ | २५.५ |
| पुणे | ३६.२ | २५.१ |
| पंढरपूर | ४०.५ | २८.१ |
| सातारा | ३८.३ | २२.९ |
| सांगली | ३९ | २४.४ |
| सोलापूर | ४१.१ | २९.५ |
| वर्धा | ४३.७ | ३२.५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम परिवाराच्या मदतीने पुढे जाल. व्यावसायिक कार्यात फायदा होण्याची शक्यता.

**वृषभ :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : उत्तर आर्थिक कामे पूर्ण होतील. परिवाराकडून सहकार्य मिळेल. काही नवीन योजना हाती घ्याल.

**मिथुन :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा:पश्चिम चतुर्याने काम केल्यामुळे वरिष्ठांकडून प्रशंसा मिळेल. आर्थिक लाभ होण्याची शक्यता.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा:दक्षिण नवीन योजना अमलात आणाल. परिवारात वातावरण चांगले राहील.

**सिंह :** शुभ रंग : जांभळा, शुभ दिशा : उत्तर व्यावसायिक अथवा जीवनातील समस्या वाढण्याची शक्यता. कौटुंबिक चिंता सुटेल.

**कन्या :** शुभ रंग:गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम मित्र व हितचिंतकांच्या भेटी होतील आईची तब्येत ठिक राहील.

**तुळ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा:उत्तर वाद–विवाद, भांडण तंटे होण्याची शक्यता. धंद्यात लक्ष द्या.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:उत्तर व्यावसायिक जबाबदारी व्यवस्थित पार पाडा. प्रवास सुखाचा होईल. आर्थिक स्थिती उत्तम राहील.


**धनु :** शुभ रंग : हिरवा, शुभ दिशा : पश्चिम वरिष्ठ लोकांमध्ये प्रतिष्ठा वाढेल. चातुर्याने काम केल्यास यश निश्चित. नवीन संपत्ती जमविण्याचा योग.

**मकर :** शुभ रंग : लाल, शुभ दिशा : पश्चिम आवक–जावक वाढेल. चलाखीमुळे थांबलेली कामे पूर्ण होतील. यश, प्रतिष्ठा वाढेल.

**कुंभ :** शुभ रंग : निळा, शुभ दिशा : पश्चिम व्यवहारात अडचणी येतील. परेशानी व धावपळ वाढेल. खर्चात कपात करावी.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा : दक्षिण आपली बुद्धीवादी समस्या सुटेल. सुख समृद्धी वाढेल. हलगर्जीपणाची कामे टाळा.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ९७३



### आडवे शब्द

१. देशभरातील लोकप्रतिनिधींचे सभागृह
५. आश्विन पौर्णिमा
७. रात्र
९. हनुमान
११. एक निरुपद्रवी निशाचर, याला लक्ष्मीचे वाहन मानतात
१२. कवितेत मला
१४. संगणकयुगात हद्दपार होऊ लागलेला
१५. तपासणी करणारा
१७. शोध
१९. नाशिकजवळचे प्रसिद्ध शक्तिपीठ
२०. माज
२२. अंतराळात प्रवास करणारे वाहन
२५. हेकट
२९. ठेका
३०. खेप, चक्कर
३१. चानी
३२. 'खाई त्याला ----' (एक म्हण)
३३. वाचन करणारा
३४. दुर्दशा
३५. रोटीचे धान्य
३६. कोरडा
३८. भगवान शंकर
४०. उपकार
४१. पितृपंधरवडा
४२. तृतीया
४४. प्रखर, रामबाण
४५. आरंभीचा
४७. सहाय्य
४९. महिषी
५१. पिवळा
५३. ओंकार
५४. विशेष
५५. संमती
५७. कुत्रा
५९. आर्थिक टंचाई
६१. सीमा
६२. बरोबर
६३. विडी
६५. हसणे
६६. धुपाबरोबर जाळला जाणारा
६७. अटकळ
६८. वर्तमानपत्रातील महत्त्वाचा कर्मचारी

### उभे शब्द

१. जनतेचा कौल
२. सगळे (हिंदी)
३. भाजलेला
४. वानरराज वालीचा पुत्र
५. जळते लाकूड
६. वेष्टन
७. उसाचा आटवलेला रस
८. आवेश, जोश
१०. नाट्यकलावंताचे दैवत
११. कोंडमारा
१३. उगवत्या सूर्याचा देश
१६. पवित्र
१८. बंध
२१. डॉक्टरची व्यवसायाची जागा
२३. अंत:करणातील अस्वस्थता
२४. यात्रेला निघालेला भाविक
२५. विष्णू
२६. नवऱ्याचा भाऊ
२७. घबाड गवसणे, नशीब उघडणे
२८. नट्टापट्टा
३०. पुरुषांचे पारंपरिक शिरोभूषण
३४. नशिबाने लाभलेले
३५. मोठा
३७. नुकसान
३९. खात्रीलायकरित्या
४१. दारुडा
४३. बस्तान
४६. प्रेम, शृंगार
४८. धान्याचे पीठ करण्याची प्रक्रिया
५०. दरोडा
५२. त्यानुसार
५३. मधुमेह
५४. धातू, पेट्रोल इ.चे भूमिगत प्राप्तिस्थान
५६. गुपित
५८. कुमक
५९. त्वचेवरील डाग
६०. थोर व्यक्तीचा जीवनपट, संपूर्ण कहाणी
६३. भुगा, चूर्ण
६४. काळजी

### जम्बो शब्दकोडे क्र. ९७२ चे उत्तर

आडवे उत्तर १.सरकार ४.नक्षा ५.गत ७.पाजी ८.दुपट्टा ९.थकवा ११.खच्चीकरण १२.धाक १४.डागडुजी १५.घोडा १७.ओलावा १९.लव २१.पाडाव २२.दाभण २४.साय २७.राखण २८.तलवार ३०.मनपसंत ३२.पोहरा ३४.टक ३५.सुईण ३६.दुसरा ३७.प्रतीक ३९.टपोरा ४१.मंद ४४.याचक ४६.खतरा ४७.नातेवाईक ५०.थारा ५१.गाल ५२.डाक ५३.अरबस्तान ५४.ऋणको ५६.नवथर ५८.वात ६०.पंचा ६१.पलंग ६२.नजर ६३.खाकरा ६४.दोरा ६५.दर्या ६६.चुना

उभे उत्तर : १.सपक २.रट्टा ३.रथ ४.नवागत ५.गच्ची ६.तकवा ७.पाणघोडा ८.दुधाचे दात १०.कडा ११.खजील १३.शिला १६.डावखुरा १७.ओणवा १८.वासा २०.वरात २१.पाणपोई २३.भलतेसलते २५.यमद्वितीया २६.खोपट २९.रक्षा ३१.संकट ३३.हणमंत ३५.सुरा ३८.कच ४०.पोळी ४२.दरा ४३.भुई ४५.कथाकथन ४६.खलबतखाना ४७.नाल ४८.वाघीण४९.कष्ट ५१.गारवा ५२.डाव ५३अ.नवरात्र ५४.ऋचा ५५.कोपरा ५६.नगद ५७.रजनी ६०.पंथ

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# जाणवं मुक्त अशा जाणिवेची संघटना म्हणजे साहित्यसम्राट - श्रीपाल सबनीस

पुणे (दै. संध्या)

या संस्थेचा प्रवास म्हणजे साहित्यिकांच्या चौदा वर्षाचा सहवास बागेतील गवतापासून सुरू होऊन स्मशानापर्यंत व्हाया दवाखाना, विद्यापीठ, महापालिका, शाळा कॉलेज, पदरस्ता ते स्मशानभूमी. कलावंतांची प्रतिभा, भूमिका सर्वकाळी, सर्वस्थानी समाज उपयोगी आणि संस्कृतीला जन्माला घालणारी ही प्रक्रिया आहे. त्यामुळे कुठल्याही पुढारी नेत्यापेक्षा कवी कलावंत अधिक वंदनीय वाटतो. सम्राट हा न्याय देणारा तसेच संधी देणारा असतो. असा विनोदसारखा संधी देणारा संघटक हा फार मिळत नाही. या संस्थेला कुठल्याही जातीचं जाणवं नाही. जाणवंमुक्त अशी जाणिवेची संस्था विनोद अष्टुळांनी निर्माण केली आहे. त्यामुळे संस्थेने अनेक प्रतिभावंत कवी साहित्यिक निर्माण केले आहेत. असे साहित्य संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणात सबनीस बोलत होते.

साहित्य सम्राट पुणे या संस्थेचे द्विशतकोत्तर रौप्य महोत्सव म्हणजे २२५ वे राज्यस्तरीय संमेलन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ यांनी स्वर्गीय विठ्ठल तुपे पाटील नाट्यगृह हडपसर येथे जागतिक पर्यावरण दिन व शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आयोजित केले होते.

प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विवेकवादी विचारवंत श्रीपाल सबनीस, कवयित्री ललिता सबनीस, संस्थापक अध्यक्ष विनोद अष्टुळ, ज्येष्ठ साहित्यिक वि.ग.सातपुते, सूर्यकांत वैद्य, चित्रपट निर्माते संजय सिंगलवार, पुणे विद्यापीठ अधिसभा सदस्य डॉ.सुनील लोखंडे, डी.एस. एसचे दादासाहेब सोनवणे, उद्योजक संदीप रणदिवे, गझलकार मसूद पटेल आदी उपस्थित होते. या सर्वांचा सन्मान संस्थेच्या आजीव सभासदांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

संमेलनाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते भारतीय संविधानाच्या पूजनाने झाली. संविधानाच्या उद्देशिकाचे वाचन सिताराम नरके यांनी केले. वृक्षआरती लक्ष्मण शिंदे यांनी गायली. तसेच मान्यवरांचे स्वागत नानाभाऊ माळी यांनी केले आणि संमेलनाचा उद्देश प्रास्ताविकेतून अध्यक्ष विनोद अष्टुळ यांनी व्यक्त केला.

पुढे सबनीस म्हणाले की या संस्थेत प्रत्येक सामान्य माणूस कवी कलावंत सम्राट झालेला आहे. येथे संमेलनाची सुरुवात संविधान पूजनाने झालेली आहे. शिवाजी महाराज ते अण्णाभाऊ साठे यामध्ये सर्व महापुरुषांचा गौरव अबाधित ठेवून महापुरुषांच्या विचारांची बेरीज एकत्र करणे म्हणजे साहित्यिक होणे होय. साहित्यिकांनी महापुरुषांना एका चौकटीत बसवता कामा नये. कविता केवळ एका धर्माची नसून सर्व धर्माला कवटाळणारी मानवतेला पोटात घालणारी, माया लावणारी, कुरवाळणारी, मानवतेला जन्माला घालणारी अशी कविता श्रेष्ठ असते. म्हणून या मंचाला धर्म नाही कुठलीही जात नाही. अशी भूमिका विनोद अष्टुळांच्या वाटचालीमधील विविध उपक्रमांद्वारे दिसून येते.

मंचावरील ज्येष्ठ साहित्यिक, विचारवंत, आदरणीय सर्वच मान्यवरांनी साहित्यसम्राट समूहाचे तसेच अध्यक्ष विनोदचे भरभरून कौतुक करून मनापासून शुभेच्छा दिल्या.

यावेळी आदर्श गुणवान व्यक्तींना साहित्य सम्राटचे पुरस्कार



देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. त्यामध्ये साहित्यरत्न पुरस्कार उज्वला यादव, शिक्षण रत्न पुरस्कार हरिदास भिसे, समाज रत्न पुरस्कार अमोल मदने आणि राष्ट्रभाषा रत्न पुरस्कार विलास बाबर यांना देण्यात आला. तसेच ज्येष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.पि.डी.कदम यांचे भिकाऱ्याचे जीवन व तिन्हीसांजेला तसेच उत्साही आयुष्य सुभाष ढगे यांच्या आणि सिताराम नरके यांच्या नात्यांच्या पाऊल खुणा या काव्यसंग्रहांचे मान्यवरात शुभहस्ते प्रकाशन करण्यात आले.

संमेलनाच्या दुसऱ्या सत्रामध्ये राज्यस्तरीय कवी संमेलन घेण्यात आले यामध्ये महाराष्ट्रातून आलेल्या कवी कवयित्री सुषमा अलेकर, अलका नाईक, अरुण बुंदेले, रेखा दुसाने, अश्विनी काळे, पूजा रोकडे, रामदास पुजारी, संदीप रासकर, प्रकाश कदम, जितेंद्र सोनवणे, महेंद्र माणिक, बाळकृष्ण अमृतकर, आनंद महाजन, स्नेहा रोकडे, जयश्री ताठे, सुवर्णा वाघमारे, विलास बाबर, सुधीर कुलकर्णी, श्रीकांत ढोबळे, जितेन सोनवणे, सूर्यकांत नामुगडे, उमाकांत आदमाने, प्रवीण वानखेडे, सुरेश धोत्रे,चंद्रकांत जोगदंड, छगन वाघचौरे अशा अनेकांनी आपल्या बहारदार रचना सादर करून हडपसरवासीय काव्य रसिकांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या संयोजनामध्ये अर्चना अष्टुळ, सुषमा रणदिवे, कन्हैया साबळे, बाळासाहेब केमकर, संजय ओसवाल आणि ओंकार अष्टुळ यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन उफाडे,कवी संमेलनाचे सूत्रसंचालन जगदीप वनशिव यांनी तर कार्यक्रमाचे आभार कवी संमेलनाचे अध्यक्ष म.भा.चव्हाण यांनी व्यक्त केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जागतिक सायकल दिनानिमित्त "संडेज ऑन सायकल" उपक्रमास उस्फुर्त प्रतिसाद

पुणे (दैनिक संध्या) : जागतिक सायकल दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विशेष "संडेज ऑन सायकल" उपक्रमास आज पणेकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पुणे महानगरपालकेच्या महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांच्या हस्ते झेंडा दाखवून सायकल रॅलीचे फ्लॅग-ऑफ करण्यात आले. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, म्हाळुंगे-बालेवाडी येथे आयोजित या कार्यक्रमामध्ये विविध वयोगटातील सायकलपटू, महिला, युवक-युवती आणि फिटनसप्रेमींनी मोठ संख्येने सहभाग नोंदविला. महपौरांनी स्वतः सायकल चालवत सहभागी नागरीकांशी संवाद साधला आणि निरोगी जीवनशैलीसाठी सायकलिंगच महत्त्व अधोरेखित केले. यावेळी बोलताना महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी सांगितले की, नियमित सायकलिंगमुळे केवळ शारीरिक आरोग्य सुधारत नाही, तर आत्मविश्वास, मानसिक स्वस्थ्य आणि सकारात्मक ऊर्जा वाढण्यासही मोठी मदत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या खेलो इंडिया आणि फिट इंडिया या राष्ट्रीय उपक्रमांच्या प्रेरणेतून असे उपक्रम राबविणे अत्यंत महत्त्वाचे आहे, असेही त्यांनी नमूद केले. "सायकल हा केवळ प्रवासाचा पर्याय नसून तो निरोगी, पर्यावरणपूरक आणि शिस्तबद्ध जीवनशैलीचा भाग आहे. नागरिकांनी आपल्या दैनंदिन जीवनात सायकलचा अधिकाधिक वापर करावा," असे आवाहन त्यांनी केले. या उपक्रमातन पर्यावरण संवर्धन, प्रदूषणमुक्त शहर आणि तंदुरुस्त समाज घडविण्याचा संदेश देण्यात आला.

### किमान 15 जूनपर्यंत राज्यात सर्वत्र मान्सूनच्या पावसाची शक्यता कमी

पुणे (दैनिक संध्या) : मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये 9 जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान 15 जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे. सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान 15 जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही. दरम्यान, किमान 12 जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान 40 अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात 35 ते 40 अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

### शालेय बस सुरक्षिततेसाठी आरटीओचे कठोर निर्देश; विशेष तपासणी मोहीम सुरु

पुणे (दैनिक संध्या) : नवीन शैक्षणिक वर्ष काही दिवसांतच सुरू होत आहे. शाळा सुरू होताच गजबजणाऱ्या शालेय बस आणि व्हॅनमधून विद्यार्थ्यांचा प्रवास सुरक्षित व्हावा, यासाठी आरटीओ प्रशासन आता ॲक्शन मोडमध्ये आले आहे. शाळा सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या सर्व गाड्या फिट ठेवा, असे आदेश आरटीओने जिल्ह्यातील सर्व शाळा व्यवस्थापन आणि शिक्षण विभागाला पत्राद्वारे दिले आहेत. शाळा प्रशासनाने प्रत्येक शाळेत शालेय परिवहन समिती स्थापन करून नियमांचे ऑडिट करावे, अशा सूचनाही आरटीओने दिल्या आहेत. बेकायदेशीर आणि विनापरवाना चालणाऱ्या व्हॅन किंवा रिक्षांमध्ये आपल्या पाल्यांना पाठवू नका, असे आवाहन आरटीओने शाळांसोबतच पालकांनाही केले आहे. शाळा सुरू होताच आरटीओकडून शहरातील मुख्य चौकांमध्ये विशेष तपासणी मोहीम राबवली जाणार आहे. आरटीओ प्रशासनाने स्पष्ट केले आहे की, शाळा सुरू होण्यापूर्वीच सर्व शालेय वाहनांचे फिटनेस (योग्यता प्रमाणपत्र) तपासून घेणे बंधनकारक आहे. गाड्यांची तांत्रिक स्थिती उत्तम असणे, ब्रेक, हेडलाईट, टायर सुस्थितीत असणे आणि वाहनांना स्पीड गव्हर्नर (वेग नियंत्रक) लावलेले असणे अत्यंत आवश्यक आहे. सर्व शालेय बस आणि व्हॅनचे आरटीओ फिटनेस प्रमाणपत्र वैध असणे गरजेचे आहे. चालकाकडे वैध परवाना असावा आणि त्याची पोलिस पडताळणी केलेली असावी. वाहनात प्रथमोपचार पेटी आणि अग्निशामक यंत्रणा कार्यरत स्थितीत असणे सक्तीचे आहे. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी शालेय बसमध्ये महिला अटेंडंट असणे आवश्यक आहे. क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना कोंबून वाहतूक करणाऱ्या वाहनांवर आणि अनधिकृत वाहनातून (पांढरी नंबर प्लेट असलेली वाहने) विद्यार्थ्यांची वाहतूक केल्यावर थेट जप्तीची कारवाई केली जाणार आहे. नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होताच शालेय वाहनांची तपासणी करण्यासाठी आरटीओची विशेष भरारी पथके तैनात केली जाणार आहेत. पालकांनीही आपल्या पाल्याला शाळेत पाठवताना ते वाहन अधिकृत आणि सुरक्षित आहे का, याची खात्री करावी. शालेय वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांची गय केली जाणार नाही आणि अशा वाहनांवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी संदीप खडसे यांनी यावेळी प्रतिक्रिया दिली.

## मध्यरात्री थरार! संशयास्पद हालचाली; थरारक पाठलाग अन् झडती घेतल्यावर जे सापडलं ते पाहून पोलिसही चक्रावले

पुणे (दै. संध्या)

कामशेत परिसरात पोलिसांनी मोठी कारवाई करत संभाव्य दरोड्याचा कट उधळून लावला आहे. रात्रगस्तीवर असलेल्या पोलिसांनी संशयास्पद हालचाली करणाऱ्या दोघांना पाठलाग करून पकडले. त्यांच्या ताब्यातून शस्त्रे, महागडे मोबाईल, डिजिटल घड्याळे आणि वाहनांसह एकूण 11 लाख 55 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. दिलेल्या माहितीनुसार, 5 जून रोजी पहाटे कामशेत पोलीस ठाण्याचे कर्मचारी गस्त घालत असताना सहारा कॉलनीजवळील मोकळ्या जागेत दोन व्यक्ती संशयास्पदरीत्या फिरताना दिसल्या. पोलिसांचे वाहन पाहताच त्यांनी दुचाकीवरून पळण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून त्यांना ताब्यात घेतले. अटक करण्यात आलेल्यांची नावे एकनाथ रोकडे आणि संकेत माने अशी आहेत. तपासादरम्यान त्यांच्या दुचाकीच्या नंबर प्लेटवर ओळख लपवण्यासाठी कापड बांधलेले आढळले.

आरोपींची झडती घेतली असता विनापरवाना धारदार कोयता, चाकू, कटर, लोखंडी रॉड, दोरखंड, मिरचीपूड तसेच अनेक महागडे मोबाईल फोन आणि डिजिटल घड्याळे आढळून आली. या सर्व वस्तू जप्त करण्यात आल्या आहेत.

पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र राऊळ यांच्या फिर्यादीवरून कामशेत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्राथमिक चौकशीत आरोपी आणखी तीन साथीदारांसह परिसरात मोठा दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा तपास सुरू असून फरार साथीदारांचा शोध घेतला जात आहे. तसेच या आरोपींचा यापूर्वीच्या गुन्ह्यांशी काही संबंध आहे का, याचाही तपास पोलीस करत आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे संभाव्य मोठा गुन्हा टळल्याचे मानले जात आहे.

## बीएनसीए संशोधन केंद्रातील पीएच. डी. विषय देशासमोरील आव्हांनासाठी उपयुक्त

पुणे (दै. संध्या)

महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनमधील (बीएनसीए) संशोधन विषय हे आपल्या देशासमोरील विविध आव्हानांना तोंड द्यायला नक्कीच उपयोगी ठरतील. तसेच संशोधन केंद्राने केलेल्या मार्गदर्शनानुसार तिथे पदवी घेतलेले २५ पीएच. डी. धारक हे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या उद्दीष्टानुसार घडले आहे, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान शाखेचे अधिष्ठाता डॉ. रावसाहेब लटपटे यांनी सांगितले. त्यांच्या उपस्थितीत २५ डॉक्टरेट मिळवलेल्यांच्या सारांश पुस्तकाचे प्रकाशन झाले.

२०१२ ते २०२५ या १३ वर्षांमध्ये बीएनसीए संशोधन केंद्रातील मार्गदर्शकांनी २५ पीएच.डी. धारक घडवले. त्यांच्या उपस्थितीत हा स्नेहमेळावा बीएनसीएच्या आवारातील आयएसडीएस सभागृहात 'जागतिक पर्यावरण दिनी' नुकताच संपन्न झाला. या प्रकाशनप्रसंगी पीएच.डी. धारकांसह बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप, उपप्राचार्य डॉ. शार्वेय धोंगडे, ज्येष्ठ आर्किटेक्ट डॉ. गोपाळ कान्हेरे,संशोधन केंद्राचे मार्गदर्शक व समन्वयक डॉ. मीरा शिरोळकर, मार्गदर्शक डॉ. वसुधा गोखले, डॉ. अभिजित नातू, तसेच डॉ. पराग नारखेडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

आपल्या सगळ्यांसाठी हा अत्यंत आनंदाचा दिवस असल्याचे डॉ. कश्यप यानी यांनी सांगितले. ते म्हणाले की, हे सर्व पीएच.डी. धारक व त्यांचे मार्गदर्शक यांनी अत्यंत खडतर परिस्थितीतून हे संशोधन कार्य तडीस नेले आहे. संशोधन केंद्राची संकल्पना डॉ. कान्हेरे यांच्या पाठपुराव्यामुळेच प्रत्यक्षात येऊ शकली.

## विद्यार्थ्यांना घडवणाऱ्या कौशल्य शिक्षण चळवळीचा दोन दशकांचा प्रवास उलगडणार

पुणे (दै. संध्या)



विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञान न देता त्यांच्यात कौशल्ये, आत्मविश्वास आणि करिअरविषयक स्पष्टता निर्माण करण्यासाठी गेली दोन दशके कार्यरत असलेल्या 'लेंड अ हॅण्ड इंडिया' (लाही) या संस्थेच्या कार्याचा गौरव सोहळा मंगळवारी (ता. ९) सायंकाळी ५.३० वाजता पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे आयोजित करण्यात आला आहे. या गौरव सोहळ्यास महाराष्ट्राचे शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह, पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम आणि उद्योजक प्रतापराव पवार यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. या कार्यक्रमातून संस्थेच्या २० वर्षांच्या कौशल्य शिक्षण चळवळीचा प्रवास आणि त्याचा लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्यावर झालेला परिणाम उलगडला जाणार असल्याची माहिती संस्थेच्या संस्थापक सुनंदा माने आणि राज गिल्डा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मिलिंद माने म्हणाले, "सन २००६ मध्ये महाराष्ट्रातील अवघ्या १०० शाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर सुरू झालेली ही चळवळ आज देशातील २० हून अधिक राज्य सरकारे, शिक्षण मंडळे आणि शिक्षण विभागांपर्यंत पोहोचली आहे. शालेय शिक्षण आणि उपजीविकेच्या संधी यांतील दरी कमी करण्यासाठी कौशल्य शिक्षणाला मुख्य प्रवाहात आणण्याचे काम 'लाही'ने केले आहे. आज संस्थेच्या माध्यमातून हजारो शाळांमधील लाखो विद्यार्थ्यांपर्यंत कौशल्य शिक्षण पोहोचत आहे. पारंपरिक शिक्षणपद्धतीत विद्यार्थ्यांना ज्ञान मिळते; मात्र प्रत्यक्ष जीवनात त्याचा उपयोग कसा करायचा, हे शिकण्याची संधी मर्यादित असते. 'लर्निंग बाय डुईंग' अर्थात 'करून शिकणे' या संकल्पनेवर आधारित कौशल्य शिक्षण विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, समस्या सोडविण्याची क्षमता, संवाद कौशल्ये आणि आत्मविश्वास विकसित करते. त्यामुळे शिक्षण अधिक अर्थपूर्ण आणि जीवनाभिमुख बनते."

राज गिल्डा म्हणाले, "लेंड अ हॅण्ड इंडियाने विकसित केलेला 'मल्टी स्किल फाउंडेशन कोर्स' हा विद्यार्थ्यांना अभियांत्रिकी, ऊर्जा व पर्यावरण, शेती, आरोग्य, सेवा क्षेत्र अशा विविध क्षेत्रांतील मूलभूत कौशल्यांचा परिचय करून देतो. विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, करिअर मार्गदर्शन आणि रोजगारक्षम कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना भविष्यातील करिअरसाठी सक्षम केले जाते. कौशल्य शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये शाळेबद्दलची आवड वाढते, शाळा सोडण्याचे प्रमाण कमी होते आणि करिअर निवडीबाबत स्पष्टता निर्माण होते."

## विक्रम गोखले अभिनित 'बेवारस - सत्य एका वळणावरचं' च टीजर लाँच

पुणे (दै. संध्या)



मराठी रंगभूमी, मराठी-हिंदी चित्रपटसृष्टीतील महान अभिनेते, दिवंगत विक्रम गोखले यांचा अखेरचा चित्रपट असलेल्या "बेवारस - सत्य एका वळणावरचं" या चित्रपटाचा टीजर लाँच करण्यात आला आहे. अतिशय हृदयस्पर्शी कथानक, उत्तम स्टारकास्ट टीजरमध्ये दिसत आहे. २५ जून रोजी हा चित्रपट संपूर्ण जगभरात प्रदर्शित होणार आहे.

हरिणी प्रॉडक्शन्स निर्मित "बेवारस - सत्य एका वळणावरचं" या चित्रपटाची प्रस्तुती शिव आर्यन फिल्म्सनं केली आहे. या चित्रपटाची निर्मिती सौ.रिया कुमार, नितीन विचारे व शिव आर्यन यांची आहे, कथा विजय राणे आणि दिग्दर्शन विजय राणे व सौ. रिया कुमार यांचे आहे. क्रिएटिव्ह दिग्दर्शन नितीन विचारे, शिरीष लाटकर यांची पटकथा, संवाद लेखन, गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन विवेक आपटे, शिर्षक गीत लेखन सौ. रिया कुमार व संगीत बिपलाब दत्ता यांचे आहे. यूजीन डिसोझा आणि योगेश कोळी यांनी छायांकन, अमीर हडकर यांनी पार्श्वसंगीत, यश सुर्वे यांनी संकलन , स्टार कास्टिंग नितीन विचारे यांनी केलं आहे. चित्रपटात विक्रम गोखले यांच्यासह तेजस्विनी पंडित, रोहिणी हट्टंगडी, उषा नाईक, निहार गिते, ऋतुजा बागवे, उदय टिकेकर, श्रीजित मराठे, आदित्य देशमुख यांच्या प्रमुख भूमिका आहेत.

## भारतीय संस्कृती केवळ भारतातच नव्हे तर बाहेरही प्रभावी - डॉ.देगलूरकर

### 'सुवर्णद्वीप' पुस्तकाचे पुण्यात प्रकाशन; इंडोनेशियातील भारतीय संस्कृतीच्या वारशावर प्रकाश

पुणे (दै. संध्या)



भारतीय संस्कृती केवळ भारतातच नव्हे तर भारताबाहेरही प्रभावी असल्याचे उत्तम उदाहरण इंडोनेशिया या देशावरून दिसून येते. आम्ही धर्माने मुस्लिम असलो. तरी संस्कृतीने हिंदू आहोत," असे इंडोनेशियाच्या परराष्ट्र मंत्र्यांनी अभिमानाने सांगितल्याचे ज्येष्ठ पुरातत्व तज्ज्ञ डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी नमूद केले.

प्राचीन इंडोनेशियातील हिंदू-बौद्ध संस्कृती, परंपरा आणि राजसत्तेचा इतिहास उलगडणाऱ्या 'सुवर्णद्वीप : हिंदू बुद्धीस्ट किंग्डम्स् ऑफ एन्शंट इंडोनेशिया' या पुस्तकाचे प्रकाशन भांडारकर ओरिएंटल रिसर्च इन्स्टिट्यूट येथे आयसीएचआरचे माजी अध्यक्ष डॉ. ए. पी. जामखेडकर यांच्या हस्ते आणि डेक्कन कॉलेजचे माजी कुलगुरू डॉ. गो. बं.देगलूरकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. पुस्तकाच्या लेखिका संगीता चाफेकर आणि ऋता उंबरजे, डॉ. अंबरीष खरे, विभा ओक, प्रकाशक पराग पुरंदरे आदि मान्यवर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषणात डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी भारतीय संस्कृतीच्या जागतिक प्रभावाची अनेक उदाहरणे दिली. इंडोनेशियातील सांस्कृतिक जीवनात रामायण आणि महाभारत आजही जिवंत असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यांनी महर्षी अगस्तींच्या इंडोनेशियातील कार्याचा तसेच स्वातंत्र्यवीर सावरकर आणि माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या इंडोनेशियाशी संबंधित आठवणींचाही उल्लेख केला.

डॉ. जामखेडकर यांनी इंडोनेशियातील मंदिरांबद्दल लोकांच्या मनात आजही असलेली पावित्र्याची भावना अधोरेखित केली. इस्लामधर्मीय बहुसंख्य देश असूनही तेथील हिंदू मंदिरांचे संवर्धन आणि जतन करण्यात आले आहे. दक्षिण-पूर्व आशियातील भारतीय संस्कृतीच्या प्रभावाचा अभ्यास करताना काही पाश्चात्त्य इतिहासकारांनी या प्रदेशाला 'इंडियनाइज्ड स्टेट्स ऑफ साउथ-ईस्ट एशिया' असे संबोधल्याचा उल्लेख त्यांनी केला.

संगीता चाफेकर यांनी सांगितले की, भारतीय संस्कृतीचा प्रसार हा आक्रमणातून नव्हे तर व्यापार, धर्म, तत्त्वज्ञान, कला आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीद्वारे झाला. भारतीय व्यापारी आणि विद्वानांनी आग्नेय आशियात विचार व परंपरा पोहोचवल्या. स्थानिक संस्कृतींसोबत झालेल्या संवादातून तेथे एक स्वतंत्र आणि वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक परंपरा विकसित झाली. भारतीय संस्कृती ही संवाद साधणारी असून ती कोणावरही लादली जात नाही, असे त्यांनी नमूद केले.

ऋता उंबरजे यांनी जावा आणि बाली बेटांवरील भारतीय संस्कृतीच्या प्रभावाची उदाहरणे दिली. रामायण, महाभारत आणि पुराणकथांतील मूळ भारतीय संकल्पना स्थानिक समाजाने स्वीकारून आपल्या सांस्कृतिक संदर्भात त्यांचे रूपांतर केले. पात्रांची नावे आणि काही तपशील बदलले असले तरी मूळ विचार भारतीय असल्याचे त्यांनी सांगितले. जावा येथील मंदिरांमध्ये रामायणाचे भव्य शिल्परूप दर्शन घडते, असेही त्यांनी नमूद केले.

डॉ. अंबरीष खरे यांनी इंडोनेशियाचा अभ्यास करताना तेथील भाषा, कला, स्थापत्य, शिलालेख, इतिहास आणि भूगोलाचा सखोल अभ्यास केल्याचे सांगितले. इंडोनेशियामध्ये आजही भारतीय संस्कृतीचा प्रभाव अनेक ठिकाणी जाणवतो. देशाचे राष्ट्रीय प्रतीक 'गरुड' असून त्यावरूनच राष्ट्रीय विमानसेवा 'गरुडा'चे नाव ठेवण्यात आले आहे. इस्लाम धर्म स्वीकारलेल्या अनेक कुटुंबांमध्येही हिंदू परंपरेबद्दल आदरभाव असून भगवद्गीतेसारख्या ग्रंथांची ओळख नव्या पिढीला करून दिली जाते, असे त्यांनी सांगितले.

कंबुज पुस्तकाच्या मराठी अनुवादक विभा ओक यांनी भारतीय संस्कृती, कला आणि स्थापत्याचा आशियातील व्यापक वारसा अधोरेखित केला. दोन्ही लेखिकांनी विषयाचा सखोल अभ्यास करून पुस्तक लिहिले असून अनुवाद करताना प्राचीन भाषांतील शब्दांचे अचूक अर्थ आणि उच्चार समजून घेणे आव्हानात्मक होते, असे त्यांनी सांगितले. मराठी वाचक या पुस्तकाच्या अनुवादाची आतुरतेने वाट पाहत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मंजिरी शहाणे यांनी केले.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### भटक्या श्वानांचा वाढता उपद्रव; घोडा व डुकराचा मृत्यू, नागरिकांचा रोष

सांगली (दैनिक संध्या) : शहरातील भटक्या श्वानांचा वाढता उपद्रव नागरिकांसह पशुधनासाठीही धोकादायक ठरत असून, नंदनवन नगरी, दत्तनगर, कलानगर व बाह्यवळण रस्ता परिसरात मोकाट कुत्र्यांची दहशत निर्माण झाली आहे. शनिवारी एका घोड्यावर भटक्या श्वानांनी हल्ला करून त्याचा मृत्यू घडवून आणला होता. त्यानंतर आज रविवारी सकाळी एका डुकराचाही श्वानांच्या हल्ल्यात मृत्यू झाल्याची घटना घडली. त्यामुळे या परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या भागात भटक्या श्वानांचे कळप दिवस-रात्र मुक्तपणे फिरत असून, रस्त्यावरून जाणाऱ्या नागरिकांवर, दुचाकीस्वारांवर तसेच पाळीव व भटक्या प्राण्यांवर हल्ले करण्याचे प्रकार वाढले आहेत. रात्रीच्या वेळी परिस्थिती अधिक गंभीर बनत असल्याचे नागरिकांनी सांगितले. सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या नियंत्रणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश दिले असतानाही सांगली मिरज आणि कुपवाड महापालिकेकडून प्रभावी कारवाई होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. श्वानांचे निर्बिजीकरण, लसीकरण आणि आक्रमक श्वानांचा बंदोबस्त याबाबतची यंत्रणा अपुरी पडत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे. शनिवारी झालेल्या घोड्याच्या मृत्यूनंतर प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत असतानाच आज डुकराचाही मृत्यू झाल्याने संतापाची लाट उसळली आहे. परिसरातील नागरिकांनी महापालिकेने त्वरित विशेष मोहीम राबवून भटक्या श्वानांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे. नंदनवन नगरी, दत्तनगर, कलानगर व बाह्यवळण रस्ता परिसरात शेकडो भटके श्वान वावरत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक आणि सकाळ-संध्याकाळ फिरायला जाणाऱ्या नागरिकांना या श्वानांमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक वेळा तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. दरम्यान, सलग दोन दिवसांत दोन प्राण्यांचा मृत्यू झाल्यामुळे महापालिकेने या घटनेची गंभीर दखल घेऊन तातडीने प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अन्यथा मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नागरिकांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे आता परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### वाईमध्ये भटक्या श्वानांचा धुमाकूळ; शंभरहून अधिक जणांना चावा

सातारा(दैनिक संध्या) : साताऱ्यातील वाई शहर व तालुक्यात मागील दोन महिन्यांत शंभरावर भटक्या श्वानदंशाच्या गंभीर घटना घडल्याचे उघडकीस आले आहे. ही संख्या जिल्ह्यातील सर्वाधिक आहे. मागील चार दिवसांपूर्वी धोम परिसरात सोळा ग्रामस्थांना भटक्या श्वानाने चावा घेतला. प्रत्येकी दोनशे चारशे मीटर परिसरात रस्त्याने जाताना दिसेल अशा प्रत्येक व्यक्तीला त्याने चावा घेतला. या सर्वांवर अद्याप उपचार सुरू आहेत. वाई शहरात मध्यवस्तीत आणि यशवंत नगर, सोनगिरवाडी, सिद्धनाथ वाडी येथे चावा घेतल्याच्या सर्वाधिक घटना घडल्याचे डॉक्टरांनी सांगितले. याबरोबरच ओझर्डे, बावधन, वाई औद्योगिक वसाहत, बोपर्डी, सुलतानपूर येथेही अशा घटना घडल्या. याच कालावधीत वाई शहरातही चावा घेतल्याच्या घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. वाई मध्ये भटके श्वान गल्लोगल्ली मोठ्या प्रमाणात आहेत. शहरात अनेक ठिकाणी त्यांना खाद्य उपलब्ध होत असल्याने नागरी वस्त्यांमध्ये व ज्या ठिकाणी खाद्य उपलब्ध आहे, अशा ठिकाणी त्यांच्या झुंडी मोठ्या प्रमाणात फिरत असतात. यावर कार्यवाही करणे गरजेचे आहे. पालिका आणि ग्रामपंचायतींना श्वान पकडणे आणि त्याचे निर्बीजीकरण करण्याचा मोठा खर्च होतो. ही प्रक्रिया खर्चिक असल्याने या बाबीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होते. वाई पालिकेने भटक्या श्वानांचे निर्बीजीकरण केले आहे. मात्र, हा प्रयत्न तोकडा पडला आहे. वाईच्या ग्रामीण रुग्णालयात लस उपलब्ध आहे. त्यामुळे नागरिकांना तातडीने लस उपलब्ध झाली. काही भागांत पाळीव श्वान आणि मांजराकडूनही चावा घेतल्याच्या घटना घडल्या आहेत. अनेकदा पाळीव प्राण्याने चावा घेतला तरीही कामात व्यस्त असल्याने या बाबीकडे दुर्लक्ष करतात व उपचार घेत नाहीत. साधे खरचटलेले, थोडीशी जखम, दात लागून झालेली जखम याप्रमाणे वेगवेगळे उपचार डॉक्टर ठरवतात.

## राज्यात पंधरा जूनपर्यंत पेरणी योग्य पावसाची शक्यता कमी ?



मुंबई (दै. संध्या) :

मान्सून दक्षिण कोकणात दाखल झाला असून, सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यांतील काही भागांमध्ये नऊ जूनपर्यंत मध्यम ते जोरदार पावसाचा अंदाज आहे. मात्र त्यानंतर किमान पंधरा जूनपर्यंत राज्यातील पावसाचा एकंदरीत जोर तसेच मान्सूनच्या प्रगतीचा वेग कमी होण्याची शक्यता हवामानाच्या सध्याच्या अंदाजातून दिसून येत आहे. त्यामुळे या कालावधीत राज्यात सर्वत्र समाधानकारक पावसाची शक्यता कमी आहे. पंधरा जून नंतरच पेरणी योग्य पाऊस होईल, चांगला पाऊस होईपर्यंत पेरण्या करू नयेत, असे आवाहन राज्य सरकारच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने केले आहे.

सध्याच्या हवामान अंदाजानुसार किमान पंधरा जूनपर्यंत विदर्भ, मराठवाडा, खानदेश, आणि मध्य महाराष्ट्रातील काही भागांमध्ये दुपारनंतर ढग आणि विखुरलेल्या स्वरूपाचा मेघगर्जनेसह वादळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. तथापि, हा पाऊस व्यापक क्षेत्रात पेरणीस पोषक ठरेल, अशी परिस्थिती अद्याप दिसत नाही.

दरम्यान, किमान १२ जूनपर्यंत राज्यातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान सध्याप्रमाणेच उच्च राहण्याची शक्यता आहे. विदर्भ व खानदेशात कमाल तापमान ४० अंश सेल्सिअसपेक्षा अधिक, तर मराठवाड्यात ३५ ते ४० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याचा अंदाज आहे.

#### शेतकरी व नागरिकांना आवाहन

- पुरेसा पाऊस होईपर्यंत पेरण्या करू नका.
- आगामी वादळी पावसावर अवलंबून राहून पेरणीची घाई करू नये.
- विजांच्या कडकडाटाच्या वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ थांबणे टाळावे.

# पदाअभावी नवनीत राणा अजूनही अस्वस्थच!

## राज्यसभेची उमेदवारी मिळवण्यासाठी पायपीट

अमरावती (दै. संध्या) :

भाजपच्या नेत्या माजी खासदार नवनीत राणा यांनी नुकतीच राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्ष सुनेत्रा पवार यांची भेट घेतल्यानंतर नव्या चर्चेला तोंड फुटले. त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. सुनेत्रा पवार यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या जागेवर आपली वर्णी लागावी, यासाठी नवनीत राणा यांची धडपड सुरू असताना त्यांना यावेळी तरी संधी मिळेल का, याची उत्सुकता ताणली गेली आहे.

नवनीत राणा यांनी २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीपुर्वी भाजपमध्ये प्रवेश केला. त्यांना लोकसभेची उमेदवारी देण्यात आली. पण, काँग्रेसच्या बळवंत वानखडे यांनी त्यांचा पराभव केला. हा राणा समर्थकांसाठी फार मोठा धक्का होता. हा पराभव त्यांच्या चांगलाच जिव्हारी लागल्याचे नंतरच्या घडामोडींमधून दिसून आले.

गेल्या मार्च मध्ये राज्यसभेच्या महाराष्ट्रातील ७ जागांसाठी पार पडलेल्या निवडणुकीच्या वेळी नवनीत राणा यांना संधी मिळेल, अशी भक्कम अपेक्षा राणा समर्थकांना होती. पण, त्यांचा भ्रमनिरास झाला. नवनीत राणा यांनी त्याविषयी उघडपणे नाराजी व्यक्त केली नाही, पण समाज माध्यमांवरील लघू-चित्रफितींच्या माध्यमातून त्यांनी आपली अस्वस्थता प्रकट केल्याचे दिसले. दरम्यान, लोकसभा निवडणुकीतील पराभवाचे उट्टे काढण्यासाठी त्यांनी महापालिका निवडणुकीच्या वेळी भाजपमधील आपल्या विरोधकांना जेरीस आणण्याची खेळी केली. तेथूनच गणित बिघडण्यास सुरूवात झाली. नवनीत राणांचे पती आमदार रवी राणा यांचा युवा स्वाभिमान हा स्वतंत्र पक्ष. त्यांनी स्वतःच्या पक्षाच्या विस्तारासाठी प्रयत्न करणे, हे चुकीचे नाही. पण, नवनीत राणा यांनी युवा स्वाभिमान पक्षाच्या यशासाठी लावलेला हातभार आणि भाजपचे महापालिका निवडणुकीत झालेले नुकसान यातून भाजपच्या वरिष्ठ नेत्यांपर्यंत चुकीचा संदेश पोहचला. त्याचे परिणाम दिसून आले.

उपमुख्यमंत्री झाल्यानंतर सुनेत्रा पवार यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने एक जागा रिक्त झाली. या जागेसाठी येत्या १८ जून रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातील जागेवर कोणाची निवड होणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. त्यातच नवनीत राणा यांचे नाव अचानक चर्चेत आले. राज्यसभेची उमेदवारी मिळवण्यासाठी नवनीत राणा प्रयत्न करीत आहेत.

त्यांनी नुकतीच सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांची भेट घेतली. त्यानंतर नवनीत राणा आणि त्यांचे पती रवी राणा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचीही भेट घेतली. या सलग भेटींमुळे राजकीय चर्चांना वेग आला. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कोट्यातून नवनीत राणा यांना राज्यसभेची संधी मिळू शकते का, याबाबत तर्कवितर्क सुरू झाले.



#### अटी आणि शर्ती लागू?

राज्यसभेच्या या जागेसाठी छगन भुजबळ यांचे नाव चर्चेत असताना नवनीत राणा यांच्या हालचालींवर राष्ट्रवादी काँग्रेसमधून विरोधाची प्रतिक्रिया उमटल्याचे सांगितले जात आहे. नवनीत राणा यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश घ्यावा, अशी अट त्यांच्यासमोर ठेवण्यात आल्याचेही बोलले गेले. पण, ही जागा भाजपच्या वाट्याला यावी आणि भाजपच्या कोट्यातून उमेदवारी मिळावी, यासाठी राणा दाम्पत्य मोर्चेबांधणी करीत असल्याची चर्चा सुरू झाली.

## परीक्षा नियम झाले कठोर; आता परीक्षा केंद्रावर दीड तास आधी पोहचावे लागणार

नागपूर (दै. संध्या) :

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नुकत्याच झालेल्या नागरी सेवा पूर्व परीक्षेमध्ये एका दिवसात उत्तर तालिका जाहीर करण्याचा नवा रेकॉर्ड आयोगाने केला. त्यानंतर एमपीएससी एक धडाकेबाज निर्णय घेत आहे. रविवार, दिनांक १४ जून, २०२६ रोजी नियोजित महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२६ राज्यातील विविध परीक्षा केंद्रावर होणार आहे. या परीक्षेसाठी आयोगाने नियम कठोर. केले आहेत. एमपीएससी च्या परीक्षा द्यायच्या असतील तर आता उमेदवारांना दीड तास आधी परीक्षा केंद्रावर जावे लागणार आहे. आयोगाची नियमावली काय आहे ते पाहूया.



महाराष्ट्र गट-ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्व परीक्षेकरीता प्रवेश दिलेल्या उमेदवारांची प्रवेश प्रमाणपत्रे आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या https://mpsconline.gov.in संकेतस्थळावरील प्रवेशपात्र उमेदवारांच्या खात्यामध्ये उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. परीक्षा कक्षात प्रवेश मिळविण्यासाठी आयोगाच्या संकेतस्थळावरुन डाऊनलोड करुन प्रिंट केलेले मूळ स्वरुपातील प्रवेश प्रमाणपत्र सोबत आणणे अनिवार्य आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

परीक्षेच्या दिवशी ऐनवेळी उद्भवू शकणाऱ्या अडचणी अथवा आंदोलने, मोर्चे, वाहतूक समस्या, अतिवृष्टी इत्यादी बाबी लक्षात घेऊन, परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी किमान दीड तास अगोदर संबंधित परीक्षा उपकेंद्रावर उपस्थित राहणे तसेच, प्रत्यक्ष परीक्षा सुरु होण्याच्या वेळेपूर्वी एक तास अगोदर परीक्षा कक्षातील स्वतः च्या बैठक क्रमांकावर उपस्थित राहणे अनिवार्य आहे. परीक्षा कक्षातील अंतिम प्रवेशासाठी विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना परीक्षा कक्षामध्ये प्रवेश दिला जाणार नाही अथवा यासंदर्भात आयोगाची कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहणार नाही. आयोगाच्या संकेतस्थळावरील उमेदवारांना सर्वसाधारण सूचना, प्रवेश प्रमाणपत्रावरील सूचना तसेच आयोगाच्या संकेतस्थळावरील गायडन्स ऑफ एक्झामिनेशन या सदराखाली उपलब्ध असलेल्या 'महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित परीक्षांच्या वेळी उमेदवारांनी करावयाच्या कार्यवाहीबाबत मार्गदर्शक सूचना' यांचे उमेदवारांनी पालन करणे अनिवार्य आहे. आयोगाकडून वेळोवेळी देण्यात आलेल्या सूचनांचे उल्लंघन करणाऱ्या उमेदवारांवर आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार ठराविक कालावधीसाठी अथवा कायमस्वरुपी प्रतिरोधनाची तसेच, प्रचलित नियम / कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल.

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**ई–निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता, महावितरण, पुणे नगर रोड विभाग, पुणे महावितरणमध्ये नोंदणीकृत नामांकित परवानाधारक विद्युत ठेकेदारांकडून खालील कामासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहे:

| निविदा क्र. | कामाचे वर्णन |
|---|---|
| EE/NRD/T-02/2026-27 | फुरसुंगी मुख्य स्टोअर , नगर रोड विभागीय स्टोअर तसेच विभागांतर्गत नियुक्त दुरुस्ती केंद्रादरम्यान वितरण ट्रान्सफॉर्मर व इतर साहित्याची वाहतूक, लोडिंग व अनलोडिंग तसेच साठवण व्यवस्थापन करणे. |

वरील ई निविदा महावितरणच्या http://www.mahadiscom.in/eTender/etender या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील .

महत्त्वाच्या तारखा

- निविदा दस्तऐवज उपलब्ध: ०९.०६.२०२६ ते १६.०६.२०२६
- निविदा सादर करण्याची शेवटची तारीख: १६.०६.२०२६, रात्री २३:५५ वाजेपर्यंत.
- निविदा रक्कम:– ५,००,०००/–

संपर्क माहिती

- कार्यालय: कार्यकारी अभियंता, महावितरण, नगर रोड विभाग,तलेरा पार्क हाऊसिंग सोसायटीजवळ, कल्याणी नगर, पुणे – ४११००६
- संपर्क व्यक्ती: अतिरिक्त कार्यकारी अभियंता, नगर रोड विभाग.
- मोबाईल क्रमांक: ७८७५७६७३५५

PRO No. PZ/ 066 /2026-27

कार्यकारी अभियंता (नगर रोड विभाग) पुणे

# राधाकृष्ण विखे पाटील यांची पुण्यावर कुरघोडी

*भाजप मौनात, तर महापालिका आयुक्त मुख्यमंत्र्यांच्या दारी!*



#### पुणे महापालिका-जलसंपदा विभागात वाद काय?

जलसंपदा विभागाने पाणीवापरावरून मार्च महिन्यात पुणे महापालिकेला नोटीस बजावली. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही पुणे महापालिका ही मंजूर १४ टीएमसी पाणीकोट्यापेक्षा जास्त म्हणजे सुमारे २२ टीएमसी पाणी वापरत असल्याचा दावा करून महापालिकेला पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा दिला. त्यानंतर पुणे महापालिकेने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे तक्रार केली. मात्र, त्यानंतर थकबाकी न भरल्यास १५ टक्के पाणीकपात करण्याबाबतची नोटीस जलसंपदा विभागाने पुणे महापालिकेला दिली.

पुणे (दै. संध्या) :

राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे पुण्याच्या थकीत पाणीपट्टीवरून पुणे महापालिकेला लक्ष्य करत असताना पुणेकरांनी बहुमताने सलग दुसऱ्यांना सत्तेवर बसवलेले भाजप मात्र मौनात गेले आहे. भाजपच्याच वरिष्ठ मंत्र्यांकडून भाजपलाच पाणीप्रश्नावरून कोंडीत पकडण्यात आले असताना, आता भाजपने प्रशासनाची ढाल पुढे केली आहे. भाजपने पुणे महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केली असल्याने पुण्याचे हे प्रकरण आता मुख्यमंत्र्यांच्या दारी गेले आहे.

पुण्यातील पाणीवापरावरून राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे गेल्या काही महिन्यांपासून पुण्याला लक्ष्य करत आले ओहत. गेल्या महिन्यात त्यांनी महापालिकेला १५ टक्के पाणी कपात करण्याचा आदेश दिला. पाणी कपात केली नाही, तर पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा दिला. आता पाणीपट्टी आणि अतिरिक्त पाणी वापराच्या शुल्कावरून महापालिका आणि जलसंपदा विभागात वाद पेटला आहे.

पुणे महापालिका ही मंजूर पाणी कोट्यापेक्षा अधिक पाणी वापरते, असा दावा जलसंपदा विभागाकडून कायम केला जातो. संबंधित पाण्यासाठी अतिरिक्त शुल्क जलसंपदा विभाग आकारते. ही आकारणी औद्योगिक दराने केली जाते. त्यास महापालिकेचा विरोध आहे. पुण्यात औद्योगिक वापरासाठी पाण्याचा वापर नगण्य असताना कोट्यवधी रुपयांची देयके जलसंपदा विभाग महापालिकेला पाठवत आला आहे. ही देयके भरण्यास महापालिकेकडून सातत्याने नकार देण्यात येत आहे.

गेल्या काही वर्षांमध्ये पुण्याची लोकसंख्या वाढली आहे. नवीन गावे महापालिकेत समाविष्ट झाली आहेत, ही बाब जलसंपदा विभागाकडून विचारात घेण्यात येत नाही. आता तर १२०० कोटी रुपयांची थकबाकी असल्याचा दावा जलसंपदा विभागाने केला आहे. त्यावरून महापालिका आणि जलसंपदा विभागात जुंपली आहे.

राज्याचे जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील हे पुण्यावर सातत्याने कुरघोडी करत आहेत. नुकतेच त्यांच्या आदेशानुसार जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता (जलसंपत्ती) कार्यालय हे कोल्हापूरला, तर मुख्य अभियंता (विशेष प्रकल्प) कार्यालय हे सोलापूरला स्थलांतरीत करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. आता पाणीपट्टीवरून वाद सुरू असताना भाजपची कोंडी झाली आहे. त्यामुळे भाजपने महापालिका आयुक्तांमार्फत विखे पाटील यांच्यावर निशाणा साधण्याची व्यूहरचना आखल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी जलसंपदा विभागाकडून सहकार्य मिळत नसल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा यांच्याकडे जलसंपदा विभागाची तक्रार केली आहे. त्यामुळे हे प्रकरण आता मुख्यमंत्र्यांच्या दरबारी गेले आहे.

हे प्रकरण थांबत नाही, तर आता पाणीपट्टी थकबाकीवरून वाद पेटला आहे. पुणे महापालिका आणि जलसंपदा विभागातील हा वाद २०१६ पासून सुरू असून, त्यावरील दावा आणि दंडाची रक्कम आता सुमारे १२०० कोटी रुपयांपेक्षा अधिक झाली आहे. या प्रकरणाची सुनावणी सध्या लवादापुढे सुरू आहे. आता महापालिका आयुक्तांनी मुख्यमंत्र्यांकडेच तक्रार केली असल्याने या वादातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कोणता तोडगा काढतात, याकडे सर्वांचे लक्ष असणार आहे.

**पुणे महानगरपालिका**

निविदा प्रकिया कक्ष

निविदा जाहिरात - नवीन कामे

विक्री कालावधी दिनांक :-०८/०६/२०२६ ते १७/०६/२०२६ वेळ : दु. २:०० पर्यंत

स्विकृती कालावधी दिनांक :-०८/०६/२०२६ ते १७/०६/२०२६ वेळ : दु. २:०० पर्यंत

जाहिरात क्र. ०८-DC-५-२०२६ दिनांक : ०५/०६/२०२६

टेंडर उघडणे दिनांक:-१९/०६/२०२६ दु. १२:०० वा.

| अ. क्र. | टेंडर क्र. | विभाग | कामाचे नाव | निविदा संच किंमत | टेंडर रक्कम | १% बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तिचे नाव व दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/DMC-5/VISHRAM/2026/01-Exeng | विद्युत | विश्रामबागवाडा क्षेत्रिय कार्यालया अंतर्गत येणाऱ्या रस्त्यावरील विद्युत पोलची देखभाल दुरुस्ती व इतर तदनुषंगिक कामे करणे. | 1359 | 1440175 | 14402 | 12 महिने | श्रीमती मोनाली मोरे 9689931480 |
| 2 | PMC/DMC-5/BIBWEWADI/2026/10-Ex | विद्युत | सन 2026-27 करिता बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीची कामे करणे | 1359 | 1693786 | 16938 | 8 महिने | शिवानंद अंकोलिकर 9689931623 |
| 3 | PMC/DMC-5/BIBWEWADI/2026/54 | विद्युत | सन 2026-27 मधील बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत येणारे एलईडी नामफलक दुरुस्तीची कामे करणे | 415 | 423546 | 4235 | 4 महिने | शिवानंद अंकोलिकर 9689931623 |
| 4 | PMC/DMC-5/BIBWEWADI/2026/55 | विद्युत | सन 2026-27 मधील बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध कार्यक्रमाकरिता तात्पुरती प्रकाश व्यवस्था व विद्युत व्यवस्था करणे | 415 | 499393 | 4994 | 6 महिने | शिवानंद अंकोलिकर 9689931623 |
| 5 | PMC/DMC-5/KASABA/2026/17 | विद्युत | कसबा क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विद्युत विषयक कामे मजुरांमार्फत करून घेणे | 415 | 999389 | 9994 | 6 महीने | संदिप सरोदे 9822094660 |
| 6 | PMC/DMC-5/KASABA/2026/34 | विद्युत | कसबा क्षेत्रीय कार्यालयाअंतर्गत प्र.क्र 22 क,मधील परिसरात महिलांसाठी आरोग्य शिबीर आयोजीत करण्यासाठी तात्पुरती विद्युत विषयक कामे करणे (मनपा शासकीय /निमशासकीय रजिस्ट्रेशन अट शिथील) | 415 | 847322 | 8473 | 1 महीने | संदिप सरोदे 9822094660 |
| 7 | PMC/DMC-5/KASABA/2026/01-EX | विद्युत | कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत पालखी सोहळयासाठी तात्पुरती प्रकाश व्यवस्था व विद्युत विषयक कामे करणे | 1359 | 2117126 | 21171 | 1 महीने | संदिप सरोदे 9822094660 |
| 8 | PMC/DMC-5/KASABA/2026/02-EX | विद्युत | कसबा पेठ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत स्ट्रीट लाईटचे खराब पोल बदलणे व विद्युत विषयक देखभाल दुरूस्तीची कामे करणे | 1359 | 1395820 | 13958 | 12 महीने | संदिप सरोदे 9822094660 |
| 9 | PMC/DMC-5/KASABA/2026/03-EX | विद्युत | प्रभाग क्र 23 ड, मधील पालखी विठोबा मंदिर व निवडुगा विठोबा मंदिर परिसर व विविध ठिकाणी पालखी उत्सव काळात विद्युत दुरूस्ती विषयक कामे करणे (मनपा शासकीय /निमशासकीय रजिस्ट्रेशन अट शिथील) | 1359 | 2118624 | 21186 | 6 महिने | संदिप सरोदे 9822094660 |
| 10 | PMC/DMC-5/KASABA/2026/04-EX | विद्युत | प्रभाग क्र 23 ड, मध्ये भवानी पेठ, नाना पेठ भागात विविध ठिकाणी पालखी उत्सव काळात विद्युत दुरूस्ती विषयक कामे करणे | 1359 | 2118606 | 21186 | 6 महिने | संदिप सरोदे 9822094660 |
| 11 | PMC/DMC-5/KASABA/2026/05-EX | विद्युत | प्र.क्र 24 ड, येथे संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज पालखी सोहळया मधील वारकरी व भाविकांसाठी उभारण्यात येणाऱ्या मंडपात विद्युत विषयक कामे आणि इतर व्यवस्था करणे (मनपा शासकीय /निमशासकीय रजिस्ट्रेशन अट शिथील) | 1359 | 2117126 | 21171 | 1 महिने | संदिप सरोदे 9822094660 |

१) पुणे म.न.पा. ची वरील कामे ही भारतातील कोणत्या ही शासकीय/निम शासकीय यंत्रणाकडील पुर्व नोंदणीचे वैध प्रमाण पत्र असलेल्या ठेकेदारांकडून (प्रत्येक कामासाठीच्या पुर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत आणि निविदेसोबत जोडलेल्या अटी शर्ती वर ठेकेदाराने स्वाक्षरी करून अ पाकिटात अपलोड करावयाचे आहे.

२) सदर कामांबाबत निविदा अटी / शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच **www.mahatenders.gov.in** या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्विकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहे.

३) ऑनलाईन निविदा प्रक्रिये संबंधी संपूर्ण माहितीसाठी पुढील क्रमांकावर संपर्क साधावा. Contact No. ०१२०-४२००४६२/०१२०-४००१००२/९१-८८२६२४६५९३.

४) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाईन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.

५) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि) ३२ दि. २२/०४/२०१६ नुसार बयाणा रक्कम ई.सी.एस./ आर.टी.जी.एस./ एन.ई.एफ.टी. सुविधेमार्फतच स्वीकारणेत येणार आहे.

सही/-
उप आयुक्त
परिमंडळ विभाग क्र. ५
पुणे महानगरपालिका, पुणे

# अडचणीत काँग्रेसचा कार्यकर्ता सोबत आहे – सतेज पाटील

## काँग्रेस शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांचा पदग्रहण सोहळा उत्साहात संपन्न



**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनिर्वाचित अध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांचा पदग्रहण सोहळा राज्याचे माजी गृहराज्यमंत्री आमदार सतेज उर्फ बंटी पाटील, लोकमत पुणेचे संपादक संजय आवटे आणि मोठ्या संख्येत काँग्रेस कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पिंपरी येथील हॉटेल मध्ये संपन्न झाला.

या पदग्रहण सोहळ्या दरम्यान सुरुवातीला मान्यवर पाहुणे सतेज पाटील येताच महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री बाबासाहेब भोसले यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, हॉलमध्ये येताच महापुरुषांच्या प्रतिमाचे पूजन करून कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्याचे माजी मंत्री काँग्रेसचे ज्येष्ठ नेते स्व. अनंतरावजी थोपटे यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

स्त्री सक्षमीकरण आणि स्त्री सामर्थ्याचा प्रवास दर्शवणारे युवतींचे नृत्य सादर करीत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली, काँग्रेसचे नेते सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या हस्ते काँग्रेसचा ध्वज नवनिर्वाचित शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांच्याकडे सोपवण्यात आला आणि तो स्वीकारात त्यांनी त्यांचा पदभार स्वीकारला.

पदग्रहण करताच पक्षातील काँग्रेस पक्षाचा विचार आणि वारसा जपणाऱ्या सर्व ज्येष्ठ नेत्यांचा सन्मान कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक बंटी पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. काँग्रेस पक्षाचा पिंपरी चिंचवड शहराचा लोगो, एस आय आर मतदार यादी पुनर्परीक्षण अभियानाच्या माहिती मदत क्रमांकाचे उद्घाटन, पिंपरी चिंचवड काँग्रेस वेबसाईटचे उद्घाटन मा. सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

यादरम्यान 20 सामाजिक तसेच राजकीय क्षेत्रातील कार्यकर्त्यांनी काँग्रेस पक्षामध्ये जाहीर प्रवेश केला यामध्ये प्रामुख्याने मुंबई येथील निवृत्त न्यायाधीश बाळासाहेब पाटील, सदाशिव तळेकर, वंचितच्या शिल्पा गायकवाड, प्रवीण कांबळे, जावेद इनामदार, महेंद्र सरोदे, अतुल शिंगाडे, मनोज गिल, बाबा बनसोडे, कमलेश जैन, गोरख खळगे यांचा समावेश होता.

नुकत्याच झालेल्या निवडणुकीत सर्वाधिक मतदान झालेल्या वाकड प्रभागातील काँग्रेसचे उमेदवार स्वप्निल बनसोडे यांनी आणि वंचित मधून मोठी मते घेत निगडी मधून निवडणूक लढलेल्या शिल्पा गायकवाड यांनी मनोगते व्यक्त केली.

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे म्हणाले, काँग्रेस पक्षाच्या बाजूने नागरिकांचा कौल स्पष्ट जाणवतो आहे या शहराची जडणघडण काँग्रेस कडूनच झाली मात्र 99 नंतर वरिष्ठ नेते शहरात येत नाहीत पवारांशी थेट सामना केला जात नाही, या भावनेने कार्यकर्ते खचत गेले आणि काँग्रेस पक्ष काही प्रमाणात कमकुवत झाला मात्र आता परिस्थिती बदलल्याने येत्या काळात सर्व वंचित उपेक्षित आणि सर्वसाधारण नागरिकांना सर्वांना सोबत घेत सर्वांची काँग्रेस करून दाखवण्याचा मानस आहे, संघटनात्मक काम करत असताना संघटन, प्रशिक्षण, प्रबोधन, आंदोलन आणि परिवर्तन या पंचसूत्री च्या माध्यमातून काम करणार आहे, मनपातील प्रचंड भ्रष्टाचार यावर आंदोलन करत असतानाच मतदार यादी पुनर्परीक्षण अभियानावर अधिक भार देत जून ते ऑक्टोबर मोठे अभियान राबवणार आहे, अल्पसंख्याकांवर होत असलेली आक्रमण हाणून पाडण्यासाठी काँग्रेसचा कार्यकर्ता मैदानात सज्ज होणार आहे, असे बनसोडे म्हणाले.

आमदार सतेज पाटील म्हणाले, पूर्वीच्या काळात स्वर्गीय रामकृष्ण मोरे स्वर्गीय अनंतराव थोपटे आणि राज्यातील इतरही नेत्यांनी पुणे जिल्ह्यात काँग्रेस पक्षाचा पाया मजबूत केला मात्र पुढील काळात आघाडीमुळे दुर्दैवाने एकमेकांच्या ठिकाणी लक्ष न देण्याचे ठरले त्यामुळे पक्ष कमी झाला पण जरी अडचण असली तरी रात्र नंतर पुन्हा सूर्य उगवतो त्यानुसार आता तयारी करा दहावीस वर्षांपूर्वीचा काँग्रेस पक्ष पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी सज्ज व्हा, परिवर्तन होऊ शकते कारण मतदार तोच निवडणुका मात्र वेगवेगळ्या आहेत. विरोधक विकास डोळ्यापुढे न ठेवता इतर सर्वच मुद्द्यांकडे दिशाभूल करत निवडणूक लढवत आहेत. मात्र काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत काँग्रेसचा कार्यकर्ता हा नागरिकांच्या सोबत अडचणीत उभा आहे हा विश्वास देत पुढे जाणे गरजेचे आहे. पिंपरी चिंचवड शहर हे फ्लोटिंग पोपुलेशन, प्रचंड आर्थिक साम्राज्य, प्रचंड विकास असे शहर बनले आहे आणि या ठिकाणी मनपा सत्तेतील लोक कारभार चुकीचा करत आहेत, राज्यातही हेच लोकसत्तेत असल्याने तिथेही कारभार असाच सुरू आहे राज्यात 9 लाख 32 हजार कोटीचे कर्ज आहे प्रत्येकाच्या डोक्यावर 60 ते 80 हजार रुपये कर्ज वेगवेगळ्या पद्धतीने राज्याने निर्माण केले आहे हे सरकार राज्याचे हित पाहण्यापेक्षा स्वतःचा फायदा पहात काम करत आहे यांचा भावकीचा वाद अजून मिटलेला नाही, लाडक्या बहीण योजनेच्या माध्यमातून निवडणुकीच्या काळात मोठ्या प्रमाणात अनुदान देऊन आता मात्र 80 लाख नावे कमी करण्यात येत आहेत हे भाजपचे मोठे अपयश आहे 14000 पुरुषांना लाडकी बहीण योजना पडताळणी न करता देत संपूर्ण राज्याची मान खाली घालण्याचे काम या सरकारने केले आहे.

18 ते 30 या वयोगटातील युवक युवतींना संविधानिक मूल्य, महापुरुषांचा खरा इतिहास सांगणे गरजेचे आहे कारण भाजपकडून खोटा इतिहास सांगत मुख्यत्वे युवकांची दिशाभूल केली जात आहे.

संजय आवटे म्हणाले, आता काँग्रेसने सिव्हिल सोसायटीला सोबत घेत काम करणे महत्त्वाचे आहे, बनसोडे सारख्या युवकाला संधी मिळणे आणि त्यांच्या पदग्रहणाला बंटी पाटील सारख्या नेत्यांनी येणे ही बाब विशेष आहे, येत्या काळात पिंपरी चिंचवड शहर हे अत्यंत महत्त्वाचे असणार आहे कारण पुणे शहर पिंपरी चिंचवड शहर आणि पीएमआरडीए चा भाग मिळवून सुमारे सव्वा कोटी मतदार या ठिकाणी आहेत सर्व जात धर्म पंथाचे लोक या ठिकाणी राहतात म्हणून येत्या काळात तरुण नेतृत्व पुढे येणे गरजेचे नव्या पिढीला नवे राजकारण संविधान मूल्यावर उभा देश हवा आहे त्यांचा देश उद्या कसा असणार आहे मुळा मुठा पावना नद्या कशा असणार आहेत विकासाचे प्रारूप काय असणार आहे पुढच्या पिढीला पाणी मिळणार आहे का या प्रश्नांवर युवकांना अधिक स्वारस्य आहे विकासाचे प्रारूप यावर नवे राजकारण हे करावे लागणार आहे मेट्रो आणि मित्र म्हणजे विकास नव्हे हे या देशाला कळालेले आहे आणि म्हणून सार्वजनिक मानवट्यांवर स्वच्छ पाणी सार्वजनिक रुग्णालयांमध्ये प्रतिष्ठितांचे उपचार श्रीमंतांचे उपचार, सार्वजनिक शाळांमध्ये श्रीमंतांची मुले शिक्षण घेणे यावर सार्वजनिक विकास अवलंबून आहे तो साध्य करणे काळाची गरज आहे. याप्रसंगी मोठ्या प्रमाणामध्ये काँग्रेसचे पदाधिकारी सामान्य नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते अतिशय उत्साह पूर्ण वातावरणामध्ये हा पदग्रहण सोहळा संपन्न झाला.

याप्रसंगी राज्याचे माजी गृहराज्यमंत्री सतेज पाटील लोकमत पुणे ते संपादक संजय आवटे, काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे, पुरोगामी चळवळीचे नेते मानव कांबळे, प्रदेश काँग्रेसचे सचिव अशोक मोरे, हाजी जाकीर शेख, दाहर मुजावर, अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष शहाबुद्दीन शेख, माजी महापौर कवीचं भाट, शिक्षण मंडळाचे माजी सभापती अभिमन्यू दही तुले, माजी नगरसेवक अत्तर भाई चौधरी, काँग्रेसचे पदाधिकारी डॉ. जितेंद्र जैन, प्रा. बी बी शिंदे, गौतम आरकडे, युवक काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस उमेश खंदारे, स्वप्निल बनसोडे, महादेव वाळुंजकर, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष सतीश काळे, प्रवीण कदम, वैभव जाधव, छावा संघटनेचे रावसाहेब गंगाधरे आदी मान्यवर उपस्थित होते.

उपक्रम यशस्वी होण्यासाठी हिराचंद जाधव, महेश नांद्रे, जितेंद्र छाबडा, विजय ओव्हाळ, हरीश डोळस, कुणाल भोसले, बाबा गैसमुद्रे, उमेश बनसोडे, सदाशिव तळेकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

---

## थोडक्यात पण महत्वाचे...



### शिवणे ग्रामपंचायत हद्दीतील बौद्ध वस्तीत जाण्यासाठी रस्ता नसल्याने नागरिक त्रस्त

पिंपरी (दैनिक संध्या) : मावळ तालुक्यातील शिवने ग्रामपंचायत असून या भागामध्ये शेतकरी मजूर दार दुग्ध व्यवसाय शेळी पालन अशी मजुरी करून या भागात नागरिकांची जीवनशैली आहे आरोग्याचे पहिले पाऊल स्वच्छता असते परंतु शिवणे गावातील बौद्ध वस्तीतील या घरांना जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे त्यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे एवढेच नव्हे तर पक्की घरे नसल्यामुळे कच्चे झोपडीअसल्यामुळे कधी आग लागेल याचा नेम सांगता येत नाही अशा ठिकाणी अग्निशामक दलाची गाडी व रुग्णासाठी रुग्णवाहिका जात नाही त्याचप्रमाणे पावसाळ्यामध्ये घरामध्ये पाणी शिरते लाईट नाही रात्री या भागात बिबट्याचा वावर असतो अशा परिस्थितीत दलित वस्तीतील नागरिकांची अवस्था बिकट झाली आहे या संदर्भात शिवणे ग्रामपंचायत मावळ तहसील कार्यालयात आम्हाला हक्काचा रस्ता मिळून देण्यात यावा असे दलित वस्तीतील नागरिकांनी लेखी स्वरुपात निवेदन दिले आहे रस्ता जाण्यासाठी हा सरकारी असून खाजगी असल्याचे सांगून काही तळीराम ताबा करत आहे याकडे संबंधित अधिकारी लोकप्रतिनिधी यांनी अशा गरीब दलित वस्तीकडे जाणारा रस्त्याची नवीन रस्ता करून त्यांना न्याय मिळावा अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे असे निवेदन देण्यात आले आहे या निवेदनात शोभा गायकवाड, राजू गायकवाड, शिवराम गायकवाड, शिवाजी गायकवाड, नारायण गायकवाड, प्रभाकर गायकवाड, ज्ञानदेव गायकवाड, यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### झुरळं जनता पार्टीचे पिंपरीत ‘बेरोजगार एल्गार’ धरणे आंदोलन

पिंपरी (दैनिक संध्या) : राज्यातील वाढत्या बेरोजगारीच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी झुरळं जनता पार्टीच्या वतीने शनिवारी (दि. 6 जून) पिंपरी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात ‘बेरोजगार एल्गार’ धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. सकाळी 10 ते सायंकाळी 5 वाजेपर्यंत हे आंदोलन झाले असून याबाबतची पूर्वसूचना आणि 10 प्रमुख मागण्यांचे निवेदन हवेली तालुक्याच्या तहसीलदारांना देण्यात आले आहे. झुरळं जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी सांगितले की, पेपरफुटी, रखडलेल्या भरती प्रक्रिया आणि वाढती बेरोजगारी यामुळे हजारो तरुणांचे भविष्य अंधारात गेले आहे. अनेक उमेदवारांचे वयोमर्यादेमुळे नुकसान होत असून शासनाने या प्रश्नांवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली. या आंदोलनातून पेपरफुटी प्रकरणांतील दोषींवर कठोर कारवाई, शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा, MCOCA अंतर्गत गुन्हे दाखल करून कठोर शिक्षा, केंद्र व राज्य शासनातील रिक्त पदे सहा महिन्यांत भरणे, 18 ते 35 वयोगटातील बेरोजगारांना दरमहा पाच हजार रुपये भत्ता, स्पर्धा परीक्षांची फी माफ करणे, कंत्राटी भरती बंद करून कायमस्वरूपी नोकरभरती, भरती प्रक्रियेतील घोटाळ्यांसाठी 24×7 हेल्पलाईन, मोफत कौशल्य प्रशिक्षण व नोकरीची हमी आणि आंदोलनकर्त्यांना संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली आहे. हे आंदोलन पूर्णपणे शांततामय आणि कायद्याचे पालन करून करण्यात आले. बेरोजगार तरुणांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहनही झुरळं जनता पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे. “नोकरी नाही तर मतदान नाही” हा नारा देत तरुणांच्या हक्कासाठी हा लढा उभारण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.




---

## पिंपळे गुरवमध्ये शाळेची इमारत ५ वर्षांपासून रखडलेली; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**पिंपळे गुरव (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या संथ आणि उदासीन कारभाराचा फटका पिंपळे गुरवमधील शेकडो विद्यार्थ्यांना बसत असल्याचे चित्र समोर आले आहे. येथील कै. शेवंताबाई खंडूजी जगताप विद्यालयाच्या नवीन इमारतीचे बांधकाम तब्बल पाच वर्षांपासून रखडले असून, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच त्यांच्या सुरक्षिततेचाही गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. रखडलेल्या कामामुळे पालक, नागरिक आणि सामाजिक कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजीचे वातावरण असून, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. एकीकडे शहरात स्मार्ट सिटीच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांची विकासकामे होत असल्याचे दावे केले जात असताना दुसरीकडे विद्यार्थ्यांना सुरक्षित व सुसज्ज शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची भावना स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे. अनेक निवेदने पाठपुरावा आणि मागण्या करुनही कामाला गती मिळत नसल्याने संताप वाढत आहे.

नवीन इमारतीचे काम अपूर्ण असल्यामुळे जगताप विद्यालयातील विद्यार्थ्यांचे शिक्षण सध्या शेल पेट्रोल पंपाजवळील पर्यायी शाळेत सुरू आहे. मात्र, हा पर्याय विद्यार्थी आणि पालकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. सुदर्शननगर वैदुवाडी प्रभातनगर, जवळकरनगर तसेच परिसरातील विद्यार्थ्यांना दररोज लांबचा प्रवास करावा लागत आहे. शाळेत जाण्यासाठी त्यांना मोठ्या वाहतुकीच्या रस्त्यांवरून जावे लागते. या मार्गांवर अवजड वाहने भरधाव दुचाकी आणि वाढती वाहतूक असल्याने अपघाताचा धोका कायम निर्माण झाला आहे

या संपूर्ण प्रकरणाबाबत महापालिकेच्या स्थापत्य विभागाकडे निवेदने देण्यात आली आहेत. मात्र, प्रत्यक्षात कामाला अपेक्षित गती मिळालेली दिसून येत नाही. परिस्थितीची पूर्ण माहिती असूनही प्रशासनाकडून ठोस भूमिका घेतली जात नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. शहराच्या विकासाच्या मोठमोठ्या गप्पा मारणाऱ्या प्रशासनाला स्वतःच्या हद्दीतील एका शाळेचे बांधकाम पाच वर्षांत पूर्ण करता येत नसेल तर विकासाच्या दाव्यांवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असताना महापालिका आता तरी जागी होणार का? असा सवाल पिंपळे गुरवकरांकडून उपस्थित केला जात आहे. जगताप विद्यालयाच्या रखडलेल्या कामाकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि सुसज्ज शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी परिसरातून होत आहे.

---

## वाकडमध्ये स्पा सेंटरच्या नावाखाली सुरू होता हायप्रोफाईल वेश्याव्यवसाय; २ पीडित महिलांची सुटका, महिला मॅनेजरला अटक

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने वाकड परिसरामध्ये सुरू असलेल्या एका नामांकित स्पा सेंटरवर छापा टाकून मोठ्या सेक्स रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. वाकडमधील ‘ब्लू डायमंड रिलॅक्सो स्पा’ येथे हायप्रोफाईल वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी ही धडक कारवाई केली.

या कारवाईत २ पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून, स्पाच्या महिला मॅनेजरला अटक करण्यात आली आहे.

अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन गिते आणि महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक वैशाली शेंडगे यांच्या पथकाने ५ जून २०२६



रोजी सायंकाळी ६:११ वाजण्याच्या सुमारास भुजबळ वस्ती, वाकड येथील भामा सेंटरमधील शॉप नंबर १०१ वर छापा टाकला. या प्रकरणी पोलिसांनी स्पा चालक मारुती ज्ञानेश्वर मुरडे (वय ४८) आणि स्पा मॅनेजर वैशाली संतोष चव्हाण (वय ३१, रा. वाल्हेकरवाडी, चिंचवड) यांच्याविरुद्ध हिंजवडी पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता (BNS) आणि अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा (PITA) अंतर्गत गुन्हा दाखल केला असून, महिला मॅनेजरला अटक केली आहे. चालू वर्षातील धडक कारवाईची आकडेवारी पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांच्या सूचनेनुसार गुन्हे शाखेने अवैध वेश्याव्यवसायाविरुद्ध मोहीम तीव्र केली आहे.

“मागील ३ वर्षांत अशी एकूण ३० आस्थापने १ वर्षासाठी बंद करण्यात आली आहेत. सार्वजनिक आणि रहिवासी भागात स्पा किंवा हॉटेलच्या नावाखाली असे अवैध धंदे चालवणाऱ्या इतरही अनेक आस्थापनांची चौकशी सध्या सुरू असून, त्यांच्यावरही लवकरच अशीच कठोर कारवाई केली जाईल.” सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे, सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड, बसवराज तेली, उपायुक्त रोहिदास पवार, डॉ. शिवाजी पवार, आणि एसीपी डॉ. विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली एएचटीयू (AHTU) पथकातील अंमलदार सुनील शिरसाट, संतोष म्हस्के, विवेक गायकवाड, गणेश कारोटे, श्रद्धा भरगुडे, वैष्णवी गावडे व इतर सहकाऱ्यांनी केली आहे.

---

## पिंपरी-चिंचवडमधील सुरक्षारक्षकांचे हाल कायम; किमान वेतनाअभावी जीवन कठीण

**खराळवाडी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील सुमारे पाच हजारांपेक्षा जास्त सुरक्षारक्षकांना आजही किमान वेतनापासून वंचित राहावे लागत असल्यामुळे वाढत्या महागाईमुळे त्यांचे जगणे अधिकच कठीण झाले आहे. दिवसाला आठ तास ड्युटी करुन इतर छोटे-मोठे कामे सांभाळूनही पुरेसे वेतन मिळत नसल्याची खंत सुरक्षारक्षकांनी व्यक्त केली आहे.

समान कामाला समान वेतन या तत्त्वानुसार कामाचे मूल्य ठरले गेले, तर आम्हालाही सन्मानाने जीवन जगता येईल, अशी भावना अनेक सुरक्षारक्षकांनी व्यक्त केली आहे. पुणे, पिंपरी चिंचवड, मावळ शहरात सुमारे ५००० हजारांहून अधिक आस्थापनांमध्ये सुरक्षारक्षक आपले कर्तव्य निभावत असून, तेथे मात्र त्यांना योग्य वेतन, सुट्या किंवा कामाच्या तासांची हमी मिळत नाही. कामामध्ये शोषण होत असल्याचा आरोप विविध सुरक्षारक्षक संघटनेने केला आहे. नोंदणीकृत सुरक्षारक्षकांसाठी किमान वेतन निश्चित करण्यासाठी बऱ्याच वर्षांपासून चर्चा सुरू आहे. मात्र, प्रभावी निर्णयाची अंमलबजावणी आजतागायत झालेली नाही.

परिणामी अनेक सुरक्षारक्षकांना महिन्याला पंधरा ते वीस हजार रुपयांवर काम करावे लागत आहे. पुणे जिल्हा सुरक्षारक्षक मंडळालाही भरघोष निधी मिळालेला नसल्याने सुरक्षारक्षकांच्या विविध कल्याणकारी योजना रखडल्या आहेत. रोजगार करार नसणे, अपूर्ण नोंदणी प्रक्रिया आणि कायदेशीर स्वसंरक्षणाचा अभाव यामुळे सुरक्षारक्षकांना अन्याय सहन करावा लागत आहे.

---

## श्रीराम विद्या मंदिरमध्ये माजी विद्यार्थ्यांचा मेळावा आणि आठवणींना उजाळा

**भोसरी (दै. संध्या)**

भोसरी येथील श्रीराम विद्या मंदिर सण २००७-०८ या सालातील इयत्ता दहावीतील विद्यार्थ्यांचा व तत्कालीन शिक्षकांचा स्नेह मेळावा नुकताच संपन्न झाला. तब्बल १८ वर्षानंतर पुन्हा एकदा दहावीचा वर्ग भरल्याने सर्वांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसून येत होता. यानिमित्ताने शालेय जीवनातील आठवणींना नवा उजाळा मिळाला. यावेळी सर्वांच्या प्रेरणास्थान राजश्री ढमाले , श्रीराम विद्यालयाचे मुख्याध्यापक लालासाहेब जगदाळे सर , सहशिक्षक सुनिता भोसले, संदीप मोरे सर, रामचंद्र राक्षे सर, गुलाब गवळी सर , मनीषा गायकवाड मॅडम, रेखा देवकर मॅडम, लक्ष्मी मुंडे मॅडम व संदीप रेटवडे सर हे शिक्षक आवर्जून उपस्थित होते.

सकाळी अकरा वाजता शाळेची घंटा वाजली व सर्व विद्यार्थी वर्गामध्ये येऊन बसले व वर्गात आलेल्या सर्व शिक्षकांचे टाळ्या वाजवून स्वागत केले

कार्यक्रमाची सुरुवात सर्व शिक्षकांवर गुलाब पुष्पांच्या पाकळ्यांचा वर्षाव करून स्वर्गात आकाशगंगा या गीतावर अतिशय भावपूर्ण वातावरणात विद्यार्थ्यांनी केले. या स्वागताने सर्व शिक्षकांची मने हेलावून गेली. शाळेच्या उभारणीमध्ये ज्यांचा मोलाचा वाटा आहे असे त्रिमूर्ती शिक्षण संस्थेचे संस्थापक कै. पांडुरंग गुळवे तसेच माजी विद्यार्थी संघाचे प्रेरणास्थान कै. खंडू ढमाले सर व मातृहृदयी कै.उमाताई गुळवे यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून करण्यात आली.

सर्व विद्यार्थ्यांनी आपला परिचय करून दिला. तसेच उपस्थित



सर्व शिक्षकांचा या बॅच तर्फे उचित सन्मान करण्यात आला. याप्रसंगी सर्व शिक्षकांनी आपली मनोगते व्यक्त केली. विद्यालयाचे मुख्याध्यापक जगदाळे सर यांनी शाळेत स्थापन केलेल्या माजी विद्यार्थी संघाच्या स्थापनेचा हेतू व त्याची चाललेली वाटचाल याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व सर्व विद्यार्थ्यांनी या माजी विद्यार्थी संघात सहभागी होऊन सामाजिक बांधिलकीची भावना ठेवून संघ मोठा कसा होईल याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी शाळेतील उत्साही शिक्षिका, प्रत्येक कामात आघाडीवर असणाऱ्या व विद्यार्थ्यांवर आईसम प्रेम करणाऱ्या शिक्षिका सुनीता भोसले मॅडम यांनी स्वर्गात आकाशगंगा या गीतावर नृत्य सादर करून मुलांनाही नृत्य करण्यास प्रवृत्त केले . त्याचबरोबर शाळेचे मुख्याध्यापक जगदाळे सर यांनी "घंटा झाली टण टण" या गीतावर मुलांसमवेत नृत्य सादर केले.या दोन्हीही गीतांचा मुलांनी निखळ आनंद घेतला. मनीषा गायकवाड मॅडम यांच्या वर्गाने यावर्षी स्वर्गात आकाशगंगा या गीतावर अनेक पाहुण्यांचे विशेष करून परदेशी पाहुण्यांचे स्वागत केले होते. आपल्या मनोगतात ती आठवण सांगताना गायकवाड मॅडम भावूक झाल्या.

नंतर मुलांनी काही फनी गेम्स घेऊन पुन्हा बालवयातील आनंद घेण्याचा प्रयत्न केला. याप्रसंगी घबाड कुंड या चित्रपटाचं प्रमोशन या चित्रपटातील बालकलाकारांसहित करण्यात आले. या बॅचच्या वतीने शाळेच्या ग्रंथालयाला पुस्तके भेट देण्यात आली. तसेच आर्थिक स्वरूपात निधी सुपूर्द करण्यात आला. भविष्यात शाळेच्या माजी विद्यार्थी संघाच्या उभारणीमध्ये व प्रगतीमध्ये आमचा वर्ग कायम आघाडीवर राहील असे आश्वासन दिले. यानंतर शाळेचा माजी विद्यार्थी सुप्रसिद्ध केटरर्स मानसपुत्र सचिन कोळेकर यांच्याकडून छान पैकी सुरुची जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### आळंदी-तुळापूर रस्त्यावरील बंगल्यात रेव्ह पार्टीवर पोलिसांचा छापा; अनेक जण ताब्यात

आळंदी (दैनिक संध्या) : आळंदी-तुळापूर रस्त्यावरील एका आलिशान बंगल्यात सुरू असलेल्या रेव्ह पार्टीवर पुणे पोलिसांनी मध्यरात्री धाड टाकत मोठी कारवाई केली. या कारवाईत नशेच्या अवस्थेत असलेल्या तरुण-तरुणींसह अनेकांना ताब्यात घेण्यात आले असून घटनास्थळावरून अमली पदार्थ व इतर संशयास्पद साहित्य जप्त करण्यात आले आहे. पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार संबंधित बंगल्यात मोठ्या आवाजात संगीत सुरू होते आणि काही जण नशेचे पदार्थ सेवन करत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांच्या विशेष पथकाने छापा टाकला. कारवाईदरम्यान बंगल्यात मोठ्या प्रमाणात तरुण-तरुणी उपस्थित असल्याचे आढळून आले. छाप्यात नशेसाठी वापरले जाणारे काही पदार्थ, मद्याच्या बाटल्या तसेच इतर साहित्य जप्त करण्यात आले आहे. ताब्यात घेतलेल्या व्यक्तींची वैद्यकीय तपासणी करण्यात येत असून त्यांच्या रक्त आणि मूत्र नमुन्यांची चाचणी केली जाणार आहे. या प्रकरणात आयोजक कोण होते, बंगला भाड्याने घेण्यात आला होता का, तसेच अमली पदार्थांचा पुरवठा कुठून झाला याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. संबंधितांविरुद्ध अमली पदार्थ प्रतिबंधक कायदा तसेच इतर लागू कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या कारवाईमुळे आळंदी परिसरात खळबळ उडाली असून पोलिसांनी अशा बेकायदेशीर पार्ट्यांविरोधात कठोर कारवाईचा इशाराही दिला आहे.



### केडगावमध्ये बेकायदेशीर गर्भपात प्रकरण; दोन डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल

केडगाव (दैनिक संध्या) : दौंड तालुक्यातील केडगाव येथील लवंगारे मॅटर्निटी अँड इन्फर्टिलिटी हॉस्पिटलमध्ये बेकायदेशीररीत्या गर्भपात केल्याप्रकरणी दोन डॉक्टरांविरुद्ध यवत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलिसांनी पुढील तपास सुरू केला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ६ जून २०२६ रोजी दुपारी सुमारे १.४५ वाजण्याच्या सुमारास केडगाव येथील लवंगारे हॉस्पिटलमध्ये हा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन विठ्ठल गुजर (उपजिल्हा रुग्णालय, दौंड) यांनी यवत पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी डॉ. स्वाती लवंगारे (रा. केडगाव, ता. दौंड) आणि डॉ. तुकाराम यशवंत मोटे (रा. उरुळी कांचन, ता. हवेली) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादीनुसार, डॉ. स्वाती लवंगारे या स्त्रीरोगतज्ज्ञ नसतानाही आणि त्यांना गर्भपात करण्याचा कायदेशीर अधिकार नसतानाही गर्भपाताच्या गोळ्यांचा साठा करून अवैधरित्या गर्भपात करत असल्याचे निष्पन्न झाले. तसेच डॉ. तुकाराम मोटे यांच्या नावाने आणि सहीने गर्भपाताच्या गोळ्या रुग्णांना देण्यात आल्याची नोंद आढळून आली असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता तसेच वैद्यकीय गर्भपात कायद्यातील विविध कलमान्वये गुन्हा क्रमांक ५७९/२०२६ दाखल करण्यात आला असून पोलीस उपनिरीक्षक अजय मोरे यांनी गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किशोर वाघज करीत आहेत.

### जुन्नरच्या शासकीय कार्यालयांत तंबाखूच्या पिचकाऱ्यांचा सुळसुळाट

ओतूर (दैनिक संध्या) : एकीकडे शासन स्वच्छ भारत अभियान आणि तंबाखूमुक्त कार्यालयांची घोषणा करत असताना, दुसरीकडे जुन्नर तालुक्यातील बहुतांश शासकीय कार्यालयांमध्येच या नियमांचा उघडपणे भंग होत असल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. कार्यालयाच्या परिसरात तंबाखू, गुटखा खाऊन खिडकीतून पिचकाऱ्या मारणे, जिने व कोपरे रंगवणे असे प्रकार सर्रास सुरू असून, यामुळे शासकीय कार्यालयांची स्वच्छता धोक्यात आली आहे. कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना दुर्गंधी आणि अस्वच्छ भिंतींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे, कार्यालय प्रमुख आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसमोरच हे प्रकार घडत असतानाही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. 'सामान्य नागरिकाने असा प्रकार केल्यास तातडीने दंड आकारला जातो; मग कर्मचाऱ्यांना मोकळीक का?' असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. आरोग्य तज्ज्ञांच्या मते, सार्वजनिक ठिकाणी थुंकल्यामुळे क्षयरोग (TB), फ्ल्यू आणि इतर विषाणूजन्य संसर्गजन्य आजारांचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढतो. अशा अस्वच्छ सवयींमुळे शासकीय कार्यालये आजारांची केंद्रे बनण्याची भीती निर्माण झाली आहे. सार्वजनिक ठिकाणी थुंकणे आणि तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन करणे हा सिगारेट आणि इतर तंबाखूजन्य उत्पादने प्रतिबंधक कायदा (COTPA) २००३ नुसार दंडनीय अपराध आहे. भारतीय न्याय संहिता आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नियमांनुसारही दंडात्मक कारवाईची तरतूद आहे; मात्र, स्थानिक प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने हे नियम केवळ कागदावरच उरले आहेत की काय, अशी स्थिती आहे.



# बेलसर टोलवर स्थानिकांच्या टोलमाफीसाठी जनआंदोलन; शेकडो ग्रामस्थांचा सहभाग

नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातून जाणाऱ्या पुणे–पंढरपूर महामार्गावरील जेजुरीजवळील तक्रारवाडी (बेलसर) टोल प्लाझावर स्थानिक नागरिकांना पूर्ण टोलमाफी मिळावी या मागणीसाठी रविवारी सकाळी सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास मोठे जनआंदोलन करण्यात आले. यावेळी परिसरातील सात गावांतील शेतकरी, ग्रामस्थ, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



खळद, शिवरी, वाळुंज, निळुंज, तक्रारवाडी, साकुर्डे आणि बेलसर या गावांच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात स्थानिक नागरिकांनी टोलमाफी हा आपला हक्क असल्याची ठाम भूमिका मांडली. गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिकांना दररोजच्या प्रवासासाठी टोल भरावा लागत असून, शेतकरी, विद्यार्थी, व्यावसायिक आणि कामगार वर्गाला त्याचा आर्थिक फटका बसत असल्याची भावना आंदोलकांनी व्यक्त केली.

आंदोलनावेळी जिल्हा परिषद सदस्य अजय इंगळे यांच्यासह परिसरातील अनेक ग्रामस्थ आणि शेतकरी उपस्थित होते. यावेळी आंदोलकांच्यावतीने टोल प्रशासनाला निवेदन देण्यात आले. स्थानिक वाहनधारकांना नियमानुसार टोलमध्ये सवलत देण्यात यावी तसेच स्थानिकांसाठी स्वतंत्र पास अथवा सवलतीची प्रभावी व्यवस्था लागू करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. सोशल मीडियावर गेल्या काही दिवसांपासून "टोलविरोधी जनआंदोलन" या मोहिमेला मोठा प्रतिसाद मिळत होता. विविध व्हॉट्सअॅप गृप, फेसबुक पेज आणि स्थानिक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून नागरिकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याला प्रतिसाद देत मोठ्या संख्येने नागरिक आंदोलनस्थळी दाखल झाले.

महत्त्वाचे म्हणजे, आंदोलन शांततेच्या मार्गाने पार पडावे यासाठी आयोजकांनी नागरिकांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या. कोणत्याही प्रकारे रस्ता रोको, तोडफोड किंवा कायदा हातात घेण्याचे प्रकार होणार नाहीत, असे आवाहनही करण्यात आले होते. त्यामुळे आंदोलन शांततापूर्ण वातावरणात पार पडले. स्थानिक नागरिकांच्या टोलसवलतीच्या मागणीबाबत टोल प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी सकारात्मक निर्णय घ्यावा, अन्यथा पुढील काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

#### उद्या होणार सर्वपक्षीय आंदोलन

या टोल प्लाजावर तालुक्यातील लोकांकडून टोल वसूल केला जाऊ नये अशी मागणी तालुक्यातील सर्वच राजकीय पक्षांनी केली आहे. सोमवारी सकाळी याच टोल प्लाजावर सर्वपक्षीय आंदोलन देखील होणार आहे एकंदरीतच पुरंदर तालुक्यातील पुणे पंढरपूर मार्गावर सुरू झालेल्या या टोल प्लाजावर तालुक्यातील लोकांकडून टोल वसूल केला जात असल्याने सर्वच लोकांकडून संताप व्यक्त केला जात आहे आता यामध्ये राजकीय पक्षाचे नेते असा मार्ग काढतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## चाकण बाजारात भाज्यांची भरपूर आवक

चाकण (दै. संध्या)

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्डमध्ये ओली भुईमूग शेंग, वांगी, फरशी, वालवड, आद्रक, काकडी, हिरवी मिरची, गाजर, ढोबळी मिरची यांची उच्चांकी आवक झाली.

कलिंगड, वांगी, दोडका, चवळी, भेंडी, हिरव्या मिरचीचे भाव वाढले आहेत. फळभाज्या व पालेभाज्यांचे भाव कडाडले आहेत. एकूण उलाढाल ६ कोटी १० लाख रुपये झाली.



चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक १ हजार २०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,००० ते १,७०० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,४०० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,६०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ५० क्विंटल झाली. लसणाला १२ हजार रुपये कमाल भाव मिळाला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ३४० क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला ४ हजार रुपयांपासून ५ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला.

शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे :

कांदा - एकूण आवक - १,२०० क्विंटल. भाव क्रमांक - १.१,७०० रुपये, भाव क्रमांक २.१,३०० रुपये, भाव क्रमांक ३.१,०००.

बटाटा - एकूण आवक - १,४०० क्विंटल.भाव क्रमांक १.१,६०० रुपये, भाव क्रमांक २.१,३०० रुपये, भाव क्रमांक ३.१,००० रुपये.

## बारामतीत पावसामुळे मोठी पडझड; युवा नेते जयदादा पवार यांची पाहणी, नागरिकांना दिला दिलासा

बारामती (दै. संध्या)

बारामती शहर व तालुक्यात झालेल्या मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडली, तसेच नागरिकांच्या घरांचीही पडझड झाली. या पार्श्वभूमीवर युवा नेते जयदादा पवार यांनी नुकसानग्रस्त भागांची प्रत्यक्ष पाहणी करून नागरिकांशी संवाद साधला.यावेळी जयदादा पवार यांनी नुकसानग्रस्त नागरिकांना धीर देत प्रशासनाच्या माध्यमातून आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. तसेच उपमुख्यमंत्री सुनेत्रावहिनी पवार यांच्या माध्यमातून शासनाकडून नुकसानग्रस्तांना योग्य मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



पावसामुळे उन्मळून पडलेल्या झाडांबाबतही जयदादा पवार यांनी संबंधित यंत्रणांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी त्याच ठिकाणी त्वरीत झाडांचे पुनरोपण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश त्यांनी दिले.

नागरिकांशी संवाद साधताना जयदादा पवार म्हणाले, "बारामती ही दादांचा श्वास आहे. बारामतीच्या प्रत्येक नागरिकाच्या सुख-दुःखात आम्ही कायम सोबत आहोत. कोणत्याही संकटात नागरिकांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही. बारामतीवर आमचे सदैव लक्ष असून नुकसानग्रस्तांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत."

## उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांच्या हस्ते 'राजामाता जिजाऊ' बस सेवेचे लोकार्पण

बारामती (दै. संध्या)

बारामती आगारात नव्याने दाखल करण्यात झालेल्या १० 'राजमाता जिजाऊ' या अत्याधुनिक स्मार्ट बस सेवेचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बारामती तालुक्यातील पायाभूत सुविधा विकासाला नेहमीच प्राधान्य दिले. त्यापैकीच एक आणि देशात मॉडेल बनलेल्या बारामती बसस्थानकाचा परिसर, बसमधील स्वच्छता राखणे, बस वेळेवर सोडण्यासह प्रवाशांची सुरक्षितता आणि त्यांच्या समस्या सोडविण्यावर राज्य परिवहन महामंडळाने (एसटी) भर द्यावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी दिले.



'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२५' या अभियानात अव्वल स्थान पटकावल्याबद्दल बारामती बसस्थानक येथे आयोजित एसटी महामंडळाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अभिनंदन कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी नगराध्यक्ष सचिन सातव, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, बारामती 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, एसटी महामंडळाचे पुणे विभाग नियंत्रक अरुण सिया, गट विकास अधिकारी किशोर माने, न.प. मुख्याधिकारी पंकज भुसे, विभागीय कामगार अधिकारी सचिन भुजबळ, आगार व्यवस्थापक प्रविण शिंदे, माजी सहाय्यक वाहतूक अधिक्षक घनश्याम सदाशिव शिंदे. यांच्यासह महामंडळाचे कर्मचारी, संघटनेचे पदाधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्रीमती पवार म्हणाल्या, 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छ सुंदर बसस्थानक अभियान २०२५' या अभियानात अव्वल स्थान पटकावल्याबद्दल बारामती बसस्थानकाला रुपये १ कोटींचे बक्षीस आणि स्मृतिचिन्ह मुंबई येथील कार्यक्रमात प्रदान करण्यात आले. स्वर्गीय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दूरदृष्टीकोनातून बारामती तालुक्यात विविध विकास कामे पूर्ण झाली आहेत. या कामांची निगा राखत तालुका विकासाच्या बाबतीत कायम प्रथमस्थानी राहण्यासाठी प्रयत्नशील राहावे. त्यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या बसस्थानकाला राज्यास प्रथम बक्षीस मिळण ही संपूर्ण बारामतीकरांसाठी अभिमानाची बाब आहे. यामुळे आता बारामतीच्या मानात आणखीन एक मानाचा तुरा रोवला आहे.

## प्रेमसंबंधातून लग्नासाठी पैशांची मागणी; मानसिक छळाला कंटाळून तरुणाची आत्महत्या

शिरूर (दै. संध्या)

प्रेमसंबंधांच्या कारणातून तरुणीच्या नातेवाइकांकडून लग्नासाठी होणारी पैशांची मागणी आणि मारहाण करत दिलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून एका तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. विशाल भैरम काळे (वय २१, रा. हुडको कॉलनी, पाणी टाकीजवळ शिरूर, सध्या कोरेगाव पार्क सिग्नलच्या पदपथावर) असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

याप्रकरणी तरुणाच्या ३२ वर्षीय बहिणीने दिलेल्या फिर्यादीनुसार कोरेगाव पार्क पोलिसांनी चैत्राली उर्फ चैतू चंदू भोसले, रोहित चंदू भोसले, रुषिकेश चंदू भोसले, कोला काळुराम काळे, परशान तुकाराम काळे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना ३० मे ते १ जूनदरम्यानच्या कालावधीत कोरेगाव पार्क कल्याणीनगर चौक सिग्नल तसेच वढू बु., शिवलेवस्ती येथील ओढ्याच्या कडेला घडली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, आत्महत्या केलेला तरुण विशाल काळेचे आरोपींच्या नात्यातील एका तरुणीसोबत प्रेमसंबंध होते.

त्याच कारणातून आरोपींनी तरुणाकडे तरुणीसोबत लग्न करण्यासाठी पैशांची मागणी केली होती. तसेच त्याला मारहाण केली. सतत होणारा जाच आणि मानसिक त्रासाला कंटाळून विशालने वढू बुद्रुक येथील शिवलेवस्तीमधील ओढ्याच्या कडेला असलेल्या लिंबाच्या झाडाला दोरीच्या साह्याने गळफास घेऊन १ जून रोजी आत्महत्या केली.

# पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्वाचा आहे

## मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी खेड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या वतीने गुणवंत विद्यार्थी गुणगौरव समारंभ संपन्न

राजगुरुनगर (दै. संध्या)

पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्वाचा आहे. त्यातूनच सक्षम नागरिक घडतात असे प्रतिपादन खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी यांनी केले. खेड तालुका एज्युकेशन सोसायटीच्या वतीने महात्मा गांधी विद्यालय, कनिष्ठ महाविद्यालय, इंग्रजी माध्यम विद्यालय या तीनही प्रशालेतील इयत्ता दहावी व बारावी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ संपन्न झाला.

यावेळी खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव गणेश जोशी, संचालक हिरामण सातकर, प्रदीप कासवा, बाळासाहेब सांडभोर, स्वानंद खेडकर, व्यवस्थापकीय अधिकारी कैलास पाचारणे, महाविद्यालयाच्या प्राचार्या संध्या कांबळे, इंग्रजी माध्यम विद्यालयाचे मुख्याध्यापक गणेश देठे, उपमुख्याध्यापिका रेखा जाधव, मानसी मेदगे, पर्यवेक्षक, शिक्षक, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.





खेड तालुका एज्युकेशन सोसायटीचे मानद सचिव एअर कमोडर गणेश जोशी पुढे म्हणाले. पुस्तकी ज्ञानाबरोबर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास महत्वाचा आहे. अभ्यासासोबत मनाचे आरोग्य चांगले ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. मन शांत आणि तणावमुक्त असेल तर अध्ययन प्रक्रिया प्रभावी होते. मानसिक आरोग्य चांगले असल्यास अभ्यासातील एकाग्रता वाढते. संस्थेचे संचालक बाळासाहेब सांडभोर म्हणाले की दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी पाल्याचा कल पाहूनच करिअरची निवड करायला हवी. कलचाचणीद्वारे विद्यार्थ्यांचा कल ओळखता येतो. करिअरची निवड करण्यासाठी समुपदेशनाची मदत घेता येते. संस्थेने या संदर्भात वाचन कक्षामध्ये करिअर कसे निवडावे व दहावी व बारावी नंतरच्या करिअर संदर्भात मार्गदर्शक फ्लेक्स लावलेले आहेत जे पालक व विद्यार्थी या दोघांसाठी उपयुक्त आहेत. यावेळी महात्मा गांधी विद्यालयाची तनिष्का पाचारणे, इंग्रजी माध्यम विद्यालयाची वैष्णवी सातकर, कनिष्ठ महाविद्यालयाची सुप्रिया गोपनार या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. पालक प्रतिनिधी म्हणून संजय पानमंद यांनी मनोगत व्यक्त केले.

महात्मा गांधी विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी ईशस्तवन व स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या संध्या कांबळे व गणेश देठे यांनी केले. इंग्रजी माध्यम विद्यालयाचे बक्षीस वितरणाचे वाचन रहिमा इनामदार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तुलसीदास घोलप व अर्चना गोडसे यांनी केले. आभार प्रदर्शन मानसी मेदगे यांनी केले.





दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

## थोडक्यात पण महत्वाचे



### व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रॉड्रिग्ज आणि शिष्टमंडळाचे प्रयाण

मुंबई (दैनिक संध्या) : व्हेनेझुएलाच्या बोलिव्हियन प्रजासत्ताकाच्या कार्यवाहक राष्ट्राध्यक्षा डेल्सी रॉड्रिग्ज आणि शिष्टमंडळ यांचे छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ येथून सायं ४.०० वाजता प्रयाण झाले. यावेळी सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ राजेश गवांदे, अतिरिक्त पोलिस आयुक्त अभिनव देशमुख, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

# क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी सुविधांवर भर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस : खासदार क्रीडा महोत्सवाची सांगता

■ नागपूर (दै. संध्या)

नागपुरात व्यापक स्तरावर क्रीडा क्षेत्रातील पायाभूत सुविधांची उभारणी करण्यात येत आहे. या सोयी-सुविधांमुळे क्रीडा क्षेत्रात मनुष्यबळ तयार होण्यास मोठ्या प्रमाणात चालना मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे व्यक्त केला. नागपुरात आयोजित आठडाभराच्या खासदार क्रीडा महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कविवर्य सुरेश भट सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. यावेळी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी, केंद्रीय युवक कल्याण व क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार कृष्णा खोपडे, आमदार प्रवीण दटके, आमदार संजय भेंडे, नवनिर्वाचित आमदार अरुण लखानी, महापौर नीता ठाकरे, क्रीडा महोत्सव आयोजन समितीचे अध्यक्ष संदीप जोशी, माजी खासदार डॉ. विकास महात्मे आदी मान्यवर उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी आयोजित होत असलेल्या क्रीडा महोत्सवाचा प्रतिसाद सातत्याने वाढत असून अनेक खेळाडूंना यानिमित्ताने संधी आणि प्रशिक्षण उपलब्ध होत आहेत. या माध्यमातून नागपुरात एक क्रीडा संस्कृती आकारास येत आहे. क्रीडा क्षेत्र हे सातत्याने बदलत असून अभ्यासासोबतच आता क्रीडा क्षेत्रात नैपुण्य मिळविण्यावरही मोठा भर दिला जात आहे. या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात व्यावसायिकता आली आहे. त्यामुळे खेळाडूंना वेगवेगळ्या क्षेत्रातील दालने उपलब्ध झाली आहेत. खेळ ही अशी संस्कृती आहे ज्यामुळे युवा पीढी योग्य दिशेने वाटचाल करू शकते. त्यातून स्पर्धात्मक वृत्ती देखील तयार होत असल्याकडे मुख्यमंत्री फडणवीस यांनी लक्ष वेधले. नागपुरात क्रीडा संस्कृतीला आणखी चालना देण्यासाठी दर्जेदार पायाभूत सुविधा उभारण्यात येत आहेत. देशातील अत्यंत आधुनिक असे क्रीडा संकुल मानकापुरात तयार होत आहे. यानिमित्ताने येथे जागतिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन देखील करता येईल. क्रीडा विद्यापीठ देखील तयार होत आहे. एकूणच या सोयीसुविधांमुळे क्रीडा क्षेत्रात मनुष्यबळ तयार होण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. आगामी खासदार महोत्सवाचे आयोजन व्यापक स्तरावर म्हणजेच विदर्भस्तरावर केले जाईल. त्यात एक लाखावर खेळाडू सहभागी होतील असे प्रयत्न केले जातील, अशी घोषणा केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केली. नागपूर हे क्रीडा राजधानी म्हणून उदयास यावे, यासाठी शहरातील क्रीडा सुविधा मोठ्या प्रमाणात उभारण्यात येत आहेत. शहरात किमान 25 जलतरण तलाव तयार व्हावेत, असे आपले प्रयत्न आहेत. शहराच्या सर्वच भागात क्रीडा सुविधांची उभारणी होणार असून शहरातील किमान एक लाख मुले-मुली सायंकाळी क्रीडा मैदानावर दिसावीत, असे आमचे स्वप्न असल्याचे केंद्रीय मंत्री गडकरी यांनी यावेळी सांगितले. देशभरात एक उद्दिष्ट घेऊन क्रीडा क्षेत्रात काम सुरू आहे. 2036 मध्ये भारतात ऑलिम्पिकचे आयोजन व्हावे, यासाठी प्रयत्न सुरू आहेत व त्यासाठी मोठ्या प्रमाणात क्रीडा क्षेत्रातील संसाधने वाढविण्यावर भर दिला जात आहे, असे प्रतिपादन क्रीडा व युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केले. हा केवळ आठ दिवसाचा महोत्सव नसून क्रीडा क्षेत्रातील भविष्यासाठी ही स्पर्धा महत्त्वाची आहे. अनेक क्रीडा प्रकारात महाराष्ट्र आघाडीवर असून हे चित्र नक्कीच सुखावणारे आहे. देशांतर्गत विविध क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्र पहिल्या तीनमध्ये दिसून येतो, ही अभिमानाची बाब आहे. क्रीडा क्षेत्रात अनेक रोजगारांच्या संधीही उपलब्ध झाली असल्याचे त्या म्हणाल्या.

नागपूर जिल्ह्यातील क्रीडा सुविधांसाठी सुमारे 45 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत असल्याची माहिती पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी बोलताना दिली. खासदार क्रीडा स्पर्धांच्या यशस्वी आयोजनाबद्दल त्यांनी आयोजक समितीचे अभिनंदन केले.




### 'खासदार क्रीडा भूषण पुरस्कार'१४ खेळाडूंना प्रदान

यंदा काही विशेष पुरस्कार प्रदान करण्यात आले. यात उत्कृष्ट संघटक पुरस्कार विजय डांगरे यांना तर उत्कृष्ट प्रशिक्षक पुरस्कार रवींद्र टोंग यांना तसेच क्रीडा सेवक पुरस्कार उमेश नायडू आणि उत्कृष्ट क्रीडा मंडळ म्हणून यंग मुस्लिम फुटबॉल क्लब यांना गौरविण्यात आले.

विविध क्रीडा प्रकारांतील १४ खेळाडूंना 'खासदार क्रीडा भूषण पुरस्कार तसेच विशेष पुरस्कार प्रदान मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. विजेते असे...

- व्हॉलीबॉल : कर्मण्य चिलकुलवार
- अॅथलेटिक्स : अंजली मडावी
- खो-खो : सिद्धेश सातपुते
- सॉफ्टबॉल : उर्वशी सनेश्वर
- हँडबॉल : हरप्रीतसिंग रंधावा
- कबड्डी : मंगला ढबाले
- स्केटिंग : अदिती धांडे
- बुद्धिबळ : श्रद्धा बजाज
- कुस्ती : नंदिनी साहू
- बॅडमिंटन : निशिका गोखे
- योगासन : भरत डेलिकर
- बास्केटबॉल : गुंजन मंत्री
- जिम्नॅस्टिक : अवनी राठोड
- जलतरण : अदित्री पयासी

# २ कोटी १७ लाख रुपये किमतीच्या औषध व वैद्यकीय साहित्य साठ्यावर कारवाई

■ मुंबई (दै. संध्या)

भिवंडी, पालघर आणि मुंबई येथील तीन आस्थापनांमधून एकूण ८१ लक्ष किमतीचा औषध साठा जप्त करण्यात आला असून १ कोटी ३५ लाख रुपये किमतीचा सर्जिकल ग्लोव्हज साठा गुणवत्ता चाचणीसाठी प्रतिबंधित करण्यात आला आहे. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार तपासणी मोहीम कारवाईत औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० आणि नियमांचा भंग करणाऱ्या कंपन्यांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या (FDA) तपास पथकाने मे.साची मेडिक, साकीनाका या आस्थापनावर टाकलेल्या छाप्यात परवाने व नोंदणी नसलेल्या व्यावसायिकाने मलेशिया येथून विना निर्जंतुकीकरण सर्जिकल ग्लोव्हजची आयात करून कोणत्याही परवान्याशिवाय साठवणूक व विक्री केल्याचे उघड झाले. आयात केलेले ग्लोव्हजची वाडा व भिवंडी येथील वैद्यकीय उपकरणे उत्पादन परवाने असलेल्या व्यावसायास पॅंकिग व लेबलीग करून पुढे त्याची विक्री करण्यास पुरवठा केला असल्याचे आढळून आले. या कारवाईत ७४.८५ रुपये किमतीचे 'विना निर्जंतुकीकरण सर्जिकल ग्लोव्हज' जप्त करण्यात आले. कागदपत्रांनुसार या पेढीने मुंबई महानगरपालिका रुग्णालयांना पुरवठा/विक्री केल्याचे आढळून आले आहे. मे.साची मेडिक या संस्थेच्या भिवंडीतील वैद्यकीय उपकरण उत्पादक आस्थापनावर कारवाई करण्यात आली.



■ वैद्यकीय उपकरणे नियम २०१७ अंतर्गत मुंबई, ठाणे व पालघर येथे एफडीएचे छापे

तथापि तपासणीदरम्यान तेथे 'वैद्यकीय उपकरणे नियम २०१७' च्या तरतुदींचा गंभीर भंग झाल्याचे आढळून आले. जनस्वास्थाच्या दृष्टीकोनातून प्रशासनाने ९.८८ लक्ष रुपयांचा ग्लोव्हजचा साठा प्रतिबंधित केला असून कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे. उत्पादन बंद करण्याचे आदेश दिले आहेत. पालघर जिल्ह्यातील वाडा येथील मेडिअर्थ लाईफकेअर आस्थापनावर टाकलेल्या छाप्यात उघडकीस आला, तिथे निर्जंतुकीकरण व इतर उपकरणे नादुरुस्त आहेत, अशा स्थितीत 'विना निर्जंतुकीकरण सर्जिकल ग्लोव्हज' खरेदी करून त्यावर कोणतीही प्रक्रिया न करता ते निर्जंतुक असल्याचे भासवून शासकिय रुग्णालयांना वैद्यकीय महाविद्यालयांना पुरवठा करण्यात आल्याची माहिती आस्थापना मालकाने दिली आहे.

# हेल्पलाईन सुरू

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन, माहिती आणि तज्ज्ञ सल्ला सहज उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र RAMP कार्यक्रमांतर्गत MSME हेल्पलाईनची सुरूवात करण्यात आली आहे. या हेल्पलाईनद्वारे राज्यभरातील उद्योजकांना पूर्णतः मोफत मार्गदर्शन व सल्ला उपलब्ध करून दिला जाणार आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय, भारत सरकार आणि जागतिक बँक यांच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या RAMP कार्यक्रमाअंतर्गत हा उपक्रम महाराष्ट्रात महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळमार्फत कार्यान्वित करण्यात आला आहे. मराठा चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज अँड एग्रीकल्चर यांच्या माध्यमातून ही हेल्पलाईन सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. राज्यातील कोणत्याही भागातील उद्योजक +918308809334 या क्रमांकावर कॉल किंवा WhatsApp करून या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. उद्योग क्षेत्रातील विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती, वित्तीय सल्ला, बाजारपेठ उपलब्धता तसेच व्यवसाय विकासासाठी आवश्यक सहाय्य या माध्यमातून मिळणार आहे. या हेल्पलाईनद्वारे नवीन उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन, उद्यम नोंदणी, GST नोंदणी व करसंबंधित सल्ला, वित्तीय नियोजन, कर्ज व पतपुरवठा, विविध अनुदान योजनांची माहिती, GeM पोर्टलवरील नोंदणी, मार्केटिंग व ब्रँडिंग, आयात-निर्यात व्यवसाय, प्रकल्प अहवाल तयार करणे, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर तसेच केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन उपलब्ध होणार आहे.

# राज्यातील सर्व ९८८ मिथेनॉल परवानेधारक संस्थांच्या तपासण्या फास्ट ट्रॅकवर; २२६ तपासण्या पूर्ण; ५१ संस्था बंद

## पुणे विषारी दारू प्रकरणानंतर कारवाई

■ मुंबई (दै. संध्या)

पुण्यातील विषारी दारू सेवनामुळे झालेल्या मृत्यू प्रकरणानंतर राज्यातील सर्व ९८८ मिथेनॉल परवानेधारक संस्थांच्या तपासण्या फास्ट ट्रॅकवर पुढील ७ दिवसात पूर्ण कराव्यात आणि कायदा व नियमातील तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या संस्थाविरुद्ध कठोर कारवाई करावी, असे निर्देश अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिले आहेत.

कायद्यातील तरतुदीचे उल्लंघन बाबत ३ जून २०२६ अखेर एकूण २२६ तपासण्या पूर्ण करण्यात आल्या आहेत. तसेच उल्लंघन आढळलेल्या प्रकरणी गुन्हे नोंद करण्याचे निर्देश दिले आहेत. औषधी वनस्पती पासून प्राप्त होणारे विषारी द्रव्यांचा उपयोग औषधांचे उत्पादनात होत असल्याने व सदर विषारी द्रव्ये महाराष्ट्र विषारी द्रव्ये नियम, १९७२ (Maharashtra Poisons Rules 1972) च्या अनुसूचिमध्ये समाविष्ठ असल्याने सदर नियमाखाली परवाने मंजुरी प्राधिकार १९७७ मध्ये आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, (महाराष्ट्र राज्य) यांना देण्यात आले आहेत. संबधित कार्यक्षेत्रात सहायक आयुक्त (औषधे) परवाने मंजुरी प्राधिकारी आहेत. राज्यातील सर्व घाऊक / किरकोळ मेथॉनोल परवाने धारकांनी, विषारी द्रव्ये, १९१९ व महाराष्ट्र विषारी द्रव्ये नियम, १९७२ अंतर्गत नियम व परवान्याच्या अटींचे तंतोतत पालन करावे. नियमांचे उल्लघन केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल विषारी द्रव्ये अधिनियम व भारतीय न्याय संहिता, २०२३ कलमांखाली गुन्हे दाखल करण्यात येतील याची नोंद घ्यावी, असा इशारा दिला आहे.

जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेविरुद्ध शासनाकडून कडक कारवाई करण्यात येत आहे. औषधांच्या बाबतील बेकायदेशीर कामकाज करणाऱ्या कोणत्याही संस्था वा व्यक्ती आणि अवैध औषध उत्पादन व विक्रीविरुद्धची कारवाई यापुढे अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण असेल असे अन्न व औषध प्रशासन आयुक्त यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र विषारी द्रव्ये नियम, १९७२ मधील अनुसुचिमध्ये नमुद विषारी द्रव्याचा वापर औषधांत करणे बंद झाले. त्यानुसार कोणतेही औषधाचे उत्पादक, घाउक किंवा किरकोळ औषधी विक्रेत्यांकडे या द्रव्याची उत्पादन, विक्री किंवा वितरणाकरीता साठवणूक करण्यात येत नाही किंवा परवाना घेतला जात नाही. त्यामुळे सन १९९२ मध्ये सर्व विषारी द्रव्ये १९७२ अनुसुचीमधून काढून टाकण्यांत आली व केवळ ७ विषद्रव्ये कायम ठेवण्यात आले. मिथेनॉल चा विषारी द्रव्ये म्हणून अनुक्रमांक 7A. मिथेनॉल (Methyl Alcohol) अंतर्भाव दि. २१ जानेवारी २०११ मध्ये करण्यात आला. महाराष्ट्र विषारी द्रव्ये (दुरुस्ती)नियम, 2011 (Maharashtra Poison (Amendment) Rule 2011) च्या नियम १८A२ च्या नियमान्वये दुरुपयोग टाळण्यासाठी मिथेनॉल ची विक्री करण्यापूर्वी त्यात Methylene Carmine व Denatonium Saccharide चे मिश्रण करणे अनिवार्य केले होते. मात्र औषधी उत्पादन करण्यासाठी मिथेनॉल च्या विक्रीसाठी ही बाब लागू नव्हती.

सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.८९३/२०१९ दाखल केले असून उच्च न्यायालय मुंबई यांनी दिलेला स्टे याचिका क्र.२५३५/२०१२ व २१५३/२०१२ मध्ये पुढे कायम ठेवण्यात आलेला आहे. सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. अन्न व औषध प्रशासनाने उक्त विशेष अनुमती याचिके अनुषंगे महाराष्ट्र राज्यातर्फे प्रतिज्ञापत्र माहे नोव्हेंबर २०२४ रोजी दाखल केले असून सन २०११ मध्ये निर्गमित मिथेनॉल या विषारी द्रव्याची विक्री करताना त्यात Colorant व Bitterant टाकण्याबाबतची अधिसूचना कायम ठेवण्याबाबत सादर केलेले आहे.




# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया !

## प्रवीण टाके, उपसंचालक, विभागीय कार्यालय,कोल्हापूर

■ मुंबई (दै. संध्या)

पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल,पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे.

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२ मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या 'मानवी पर्यावरण परिषदेत ' मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून घोषित केला आणि १९७३ पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५० हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये ' पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे ' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक 'लेस्टर ब्राऊन ' यांनी म्हटले आहे की, 'पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही. तर ज्येष्ठ पर्यावरणवादी 'वंगारी मथाई' यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते. भारतासमोर पर्यावरणासंदर्भात अनेक संधी आणि आव्हाने आहेत. लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे ही महत्त्वाची क्षेत्रे आहेत. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता, शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. विकासकामे आणि पर्यावरण यांचा समतोल राखणे हे आधुनिक प्रशासनासमोरील मोठे आव्हान आहे. त्यामुळे कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून, त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट ) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते.त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे,त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे,असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात. महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत.पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे.लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी '५० कोटी वृक्ष लागवड अभियान ' राबविले होते.दरवर्षी राज्य शासन जून – जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.राष्ट्रीय बांबू मिशन अंतर्गत शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, पर्यावरण संवर्धन करणे,उपजीविका विकासाची संधी देणे आणि बांबू-आधारित उद्योगांना चालना देणे हा बांधावरील बांबू लागवड योजनेचा मुख्य उद्देश आहे. याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना,शेततळे अभियान,गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना,नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मॅंग्रोव्ह संवर्धन प्रकल्प, तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे.मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे.या महत्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत. हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था,शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी,तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे. पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत.

'जल, जमीन आणि जंगल ' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे. मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते.जून महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे.पर्यटनाला जाताना सोबत 'सीडबॉल' घेऊन जाणे,जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे. मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही; त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे.आज गरज आहे ती निसर्गाला मानवी हस्तक्षेपापासून अभय देण्याची. जलसाठ्यांचे संरक्षण, नदीपात्रांचे जतन, सांडपाणी व्यवस्थापन,जंगलांचे संवर्धन, जैवविविधतेचे रक्षण,अक्षय ऊर्जा निर्मिती आणि नैसर्गिक संसाधनांचा संयमी वापर या माध्यमातून आपण पर्यावरण समृद्ध करू शकतो. जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने प्रत्येकाने एक झाड, एक जलस्रोत आणि एक पर्यावरणपूरक सवय यांचे संवर्धन करण्याचा संकल्प केला, तर हरित, समृद्ध आणि शाश्वत भविष्यासाठीचा मार्ग अधिक सुकर होईल.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## रुपालीताई कांडगे यांनी सुरु केला विकास कामांचा धडाका; गतिरोधक बसवले

चाकण (दैनिक संध्या) : चाकण नगर परिषदेच्या नगरसेविका रूपालीताई राहुलदादा कांडगे यांनी चाकण शहरातील त्यांच्या प्रभागात प्रलंबित कामे मार्गी लावून विकास कामांचा धडाका सुरू केला आहे. चाकण मध्ये गतिरोधक बसविण्यात आले आहेत. विशेष म्हणजे चक्रेश्वर कॉलनीतील रस्त्यावर वाहनांच्या वाढत्या वेगामुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. नागरिकांच्या सुरक्षेसाठी केलेल्या मागणीची तात्काळ दखल घेत सभापती रुपालीताई कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गतिरोधक बसविण्यात आले. सुरक्षित प्रवास, शब्दपूर्ती, अंगणवाडी क्र. ७७ ब्राम्हण आळी, चाकणच्या नूतनीकरणासाठी विशेष पुढाकार घेतला आहे. चाकण नगरपरिषद प्रभाग क्र. ११ मधील ब्राम्हण आळी येथील अंगणवाडी क्र. ७७ ची दुरूस्ती, रंगकाम आणि नवीन थ्रीट्रॅक खिडक्या बसवण्याच्या कामा संदर्भात महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती रुपालीताई राहुलदादा कांडगे यांनी अंगणवाडी सेविका आणि ठेकेदारांसोबत प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. लवकरच येथील चिमुरड्यांसाठी हवेशीर आणि देखणी अंगणवाडी सज्ज होणार आहे. रुपालीताई कांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली चाकणमध्ये विविध विकासकामांचा प्रत्यक्ष आढावा आणि पूर्तता सुरू करण्यात आली आहे. आगरवाडी अंगणवाडी नूतनीकरण, ८५ टक्के काम पूर्ण झाले आहे. उर्वरित काम लवकरच मार्गी लावून अंगणवाडी नव्या रूपात चिमुरड्यांच्या सेवेसाठी सज्ज होणार आहे. अंगणवाडी क्र. ७७ ब्राम्हण आळीत विशेष पुढाकार घेऊन तेथील दुरुस्ती, रंगकाम आणि नवीन थ्रीट्रॅक खिडक्यांच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी केली. हवेशीर आणि देखणी अंगणवाडी साकारणार आहे. चक्रेश्वर कॉलनी रस्ता सुरक्षा करण्यात आली. त्यामुळे रूपालीताई कांडगे यांच्यावर चाकण शहरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.




## केसनंद बनावट महसूल आदेश प्रकरण; चौकशीत मोठे गौप्यस्फोट होण्याची चर्चा

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : केसनंद बनावट महसूल आदेश प्रकरणात सखोल चौकशी होऊन गुन्हे दाखल झाल्यास अनेक धक्कादायक नावे आणि बाबी समोर येऊ शकतात, अशी चर्चा प्रशासन व राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र, या प्रकरणावर राजकीय दबाव टाकून पडदा टाकण्याचा प्रयत्न होऊ नये, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. बनावट आदेश, महसुली कागदपत्रांमधील फेरफार आणि दलालशाहीच्या साखळ्यांचा छडा लावला गेला, तर अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या गैरप्रकारांचे जाळे उघड होऊ शकते. पूर्व हवेलीतील वाढता राजकीय हस्तक्षेप, महसूल अधिकाऱ्यांवरील दबाव आणि दलालशाहीच्या आरोपांच्या पार्श्वभूमीवर या प्रकरणात महसूलमंत्र्यांनी या भागात विशेष लक्ष घालण्याची मागणी जोर धरत आहे. सध्यातरी पूर्व हवेलीत एकच चर्चा ऐकायला मिळत आहे. 'जनता वाऱ्यावर, दलाल मात्र सत्तेच्या छत्राखाली!' प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी वेळेत हस्तक्षेप केला नाही, तर अशा प्रकरणांची मालिका भविष्यात आणखी गंभीर स्वरूप धारण करू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे. केसनंद येथे महसूल विभागाचे कथित बनावट आदेश तयार झाल्याचा प्रकार समोर आल्यानंतर महसूल प्रशासनातील अनेक गंभीर बाबी चर्चेत आल्या आहेत. बनावट आदेशांच्या माध्यमातून प्रशासकीय निर्णयांवर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न झाला का? याची चौकशी होणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे. स्थानिक नागरिकांच्या मते, काही राजकीय पंटर आणि त्यांच्या निकटवर्तीयांनी प्रशासकीय यंत्रणेत मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप करून वातावरण दूषित केले आहे. अनेक निर्णयांमागे सामान्य नागरिकांचा नव्हे, तर विशिष्ट दलाल आणि हितसंबंधी गटांचा प्रभाव असल्याचा आरोप होत आहे.

# उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांकडून वादळग्रस्त भागाची पाहणी

### उन्मळून पडलेल्या झाडांच्या पुनर्रोपणासह नवीन वृक्षारोपण उपक्रम राबवावा - उपमुख्यमंत्री; सायकल रॅलीचा शुभांरभ

**बारामती (दै. संध्या)**

बारामती शहर आणि परिसरात शुक्रवारी झालेल्या वादळी पावसामुळे शहरातील उन्मळून पडलेल्या झाडांचे मुळासकट पुनर्रोपण करावे, पावसाळ्यापुर्वी नव्याने अधिकाधिक वृक्षारोपण करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. तत्पूर्वी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडिया, बारामती सायकल क्लब आणि बारामती हेल्थ क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सायकल रॅलीला श्रीमती पवार यांच्या हस्ते झेंडा दाखवून शुभारंभ करण्यात आला.

तिरंगा सर्कल ते पुनावाला गार्डन रेल्वे स्टेशन मार्ग दरम्यान आयोजित सायकल रॅलीचा



शुभारंभ श्रीमती पवार यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच त्यांनी शहरातील वादळग्रस्त भागाची पाहणी केली. यावेळी बारामतीचे नगराध्यक्ष सचिन सातव, उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे, बारामती 'एमआयडीसी'चे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, गट विकास अधिकारी किशोर माने, न.प. मुख्याधिकारी पंकज भुसे यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी तसेच पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक संभाजी होळकर, स्थानिक लोकप्रतिनिधी, एन्व्हॉर्यमेंटल फोरम ऑफ इंडिया, बारामती सायकल क्लब आणि बारामती हेल्थ क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते.

श्रीमती पवार म्हणाल्या, बारामती शहर आणि परिसरात शुक्रवारी झालेल्या वादळी पावसामुळे शहरातील नागरिकांचे जनजीवन विस्कळीत झाले होते, यावेळी नागरिकांच्या पुढाकाराने तसेच सर्व यंत्रणांनी अहोरात्र काम करुन जनजीवन पूर्ववत केले. या कालावधीत शहरातील अनेक झाडे उन्मळून पडली, त्यांचे पुनर्रोपण करावे. येत्या पावसाळ्यात अधिक वेगाने वाऱ्याचे वहन झाल्यास झाडे वाचली पाहिजेत, याकरिता उपाययोजना कराव्यात.

निवडणूकीची आचारसंहिता संपुष्टात आल्याने विकास कामांना गती द्यावी, प्रलंबित प्रकल्प गतीने पूर्ण करावे, स्वर्गीय अजित पवार यांच्या स्वप्नातील बारामती तालुका विकसित करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन वादळग्रस्त भागाची पाहणीदरम्यान उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी केले.

## भामा-आसखेड जलयोजना: पाणीपुरवठा समस्येची महापौर मंजुषाताई नागपुरे यांच्याकडून प्रत्यक्ष पाहणी

**पुणे (दै. संध्या)**

पुणे शहरातील धानोरी, टिंगरेनगर, नागपूर चाळ, शांतीनगर, विमाननगर, वडगाव शेरी व परिसरातील नागरिकांकडून मागील काही दिवसांपासून पिवळसर व दुर्गंधीयुक्त पाणी येणे तसेच अनियमित पाणीपुरवठ्याबाबत तक्रारी प्राप्त होत असल्याच्या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिकेच्या माननीय महापौर सौ. मंजुषाताई नागपुरे यांनी भामा-आसखेड जलयोजनेअंतर्गत करेळी येथील संबंधित पंपगृह व जलशुद्धीकरण केंद्राची प्रत्यक्ष पाहणी केली.

> पुणेकरांना स्वच्छ, सुरक्षित आणि नियमित पाणीपुरवठा करणे ही महानगरपालिकेची सर्वोच्च प्राथमिकता आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित कोणतीही तडजोड केली जाणार नाही. संबंधित सर्व विभागांनी समन्वय साधून या समस्येचे कायमस्वरूपी निराकरण करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी.
>
> - सौ. मंजुषाताई नागपुरे, महापौर, पुणे महानगरपालिका

या वेळी नगरसेविका अश्विनी भंडारे, संगीता दांगट, रेखा टिंगरे, अनिल टिंगरे, नंदिनी झेंडे, हर्षल टिंगरे, शितल सावंत, सुहास टिंगरे, श्रेयस खांदवे, अनिल सातव, ऐश्वर्या पठारे, रामदास दाभाडे, शैलजीत बनसोडे, रत्नमाला सातव, तृप्ती भरणे, सुरेंद्र पठारे, नारायण गलांडे, श्वेता गलांडे, कविता गलांडे, योगेश मुळीक, अविनाश साळवे, सायरा शेख, अश्विनी लांडगे, विशाल मलके तसेच पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता, संबंधित स्थापत्य अभियंते व विद्युत अभियंते उपस्थित होते.

पाहणीदरम्यान अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, भामा-आसखेड जलयोजनेच्या पंपगृह व जलशुद्धीकरण केंद्रास वीजपुरवठा करणारी चाकण-करंजविहिरे विद्युत वाहिनी वारंवार खंडित होत असल्यामुळे पंपिंग प्रक्रिया प्रभावित होत आहे. परिसरातील विविध विकासकामांमुळे विद्युत वाहिनीला वारंवार अडथळे निर्माण होत असून त्याचा थेट परिणाम पाणीपुरवठ्यावर होत आहे.

## जागतिक सायकल दिनानिमित्त फुरसुंगी सायकलिस्ट ग्रुपची पुणे ते गोवा सायकल राईड

**कोरेगावमुळ (दै. संध्या)**

जागतिक सायकल दिनाचे औचित्य साधून फुरसुंगी सायकलिस्ट ग्रुपच्या वतीने फुरसुंगी (पुणे) ते गोवा या विशेष सायकल राईडचे आयोजन करण्यात आले आहे. पर्यावरण संवर्धन, आरोग्यदायी जीवनशैली आणि सायकलिंग संस्कृतीचा प्रसार हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. या राईडमध्ये फुरसुंगी परिसरातील अनेक उत्साही तरुण सायकलिस्ट सहभागी झाले असून अवघ्या दोन दिवसांत सुमारे ५०० किलोमीटरचे अंतर पूर्ण करण्याचा त्यांचा मानस आहे. या साहसी मोहिमेत अमोल वाजे, जीवन पवार, प्रवीण भोसले, गुणवंत गायकवाड, रवींद्र हरपळे, प्रशांत कामठे, रामदास लावंड, संतोष मुसुडगे, किरण कामठे व गोरख कामठे हे सायकलपटू सहभागी झाले आहेत. फुरसुंगी सायकलिस्ट ग्रुप गेल्या अनेक वर्षांपासून आरोग्य, फिटनेस आणि सामाजिक जनजागृतीसाठी विविध सायकल मोहिमा राबवत आहे. यापूर्वीही ग्रुपच्या सदस्यांनी तिरुपती बालाजी, अयोध्या, पंढरपूर तसेच इतर अनेक धार्मिक व ऐतिहासिक स्थळांपर्यंत सायकल राईड करून उल्लेखनीय प्रवास पूर्ण केले आहेत.

सायकलिंगमुळे शारीरिक तंदुरुस्ती वाढण्यास मदत होते, इंधनाची बचत होते तसेच पर्यावरणाचे संरक्षणही होते. याच संदेशाचा प्रसार करण्यासाठी जागतिक सायकल दिनानिमित्त ही राईड आयोजित करण्यात आली असल्याचे ग्रुपच्या सदस्यांनी सांगितले.या उपक्रमाचे नागरिकांकडून कौतुक होत असून तरुणांनी नियमित सायकलिंगचा अवलंब करून निरोगी जीवनशैली स्वीकारावी, असा संदेश या राईडच्या माध्यमातून देण्यात येत आहे. फुरसुंगी सायकलिस्ट ग्रुपच्या या उपक्रमामुळे परिसरातील युवकांमध्ये सायकलिंगबाबत नवीन प्रेरणा निर्माण होत असून भविष्यातही अशाच साहसी व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे ग्रुपच्या वतीने सांगण्यात आले.

## पुणे ग्रँड टूर सायकल शर्यतीला जगातील चौथी ग्रँड टूर बनविण्यासाठी यूसीआय करणार सहकार्य

**पुणे (दै. संध्या)**

जागतिक सायकलिंगची सर्वोच्च संघटना असलेल्या युनियन सायक्लिस्ट इंटरनॅशनल (यूसीआय) या संघटनेने पुणे ग्रँड टूर (पीजीटी) या स्पर्धेला जगातील चौथी ग्रँड टूर म्हणून विकसित करण्यासाठी आणि पुण्याला जागतिक क्रीडा पर्यटनाचे अग्रगण्य केंद्र म्हणून घडविण्यासाठी संपूर्ण सहकार्य देण्याची ग्वाही दिली आहे.

इटलीतील लेक गार्डा येथे यूसीआय व्यवस्थापन समितीसमोर पुणे ग्रँड टूरच्या आयोजन समितीने केलेल्या विशेष सादरीकरणादरम्यान, जागतिक सायकलिंग नियामक संस्थेने पुणे ग्रँड टूरच्या दर्जाचे कौतुक केले. जगातील सर्वोत्तम सायकल शर्यतींशी तुलना करता येईल अशा दर्जाची स्पर्धा आयोजित करण्यात आल्याचे यूसीआयने नमूद केले. तसेच एवढ्या मोठ्या प्रमाणावर आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्पर्धेची संकल्पना, नियोजन आणि अंमलबजावणी अवघ्या सहा महिन्यांत करण्यात आल्याबद्दल विशेष प्रशंसा करण्यात आली.

पाच दिवस चाललेल्या या स्पर्धेला उपस्थित राहिलेल्या तब्बल २५ लाखांहून अधिक प्रेक्षकांनी (भारतातील कोणत्याही क्रीडा स्पर्धेसाठीची ही सर्वाधिक उपस्थिती) दाखविलेल्या शिस्तीचे यूसीआयने विशेष दाखल घेतली. एवढ्या अभूतपूर्व गर्दीतही उत्कृष्ट सुरक्षा व्यवस्था राखल्याबद्दल पोलीस दल आणि जिल्हा प्रशासनाचेही




अभिनंदन देखील युसीआय तर्फे यावेळी करण्यात आले.

युरोपबाहेर भविष्यातील ग्रँड टूर उभारण्याची ही पहिली खरी संधी असल्याचे नमूद करत यूसीआयचे अध्यक्ष डेव्हिड लॅपार्टिएंट यांनी स्पर्धेच्या दीर्घकालीन विकासासाठी संस्थेचे संपूर्ण सहकार्य जाहीर केले. यामध्ये शहरी वाहतूक नियोजनासंबंधी तज्ज्ञ मार्गदर्शन तसेच भारतातील तळागाळातील सायकलिंग विकास कार्यक्रमांना बळकटी देण्यासाठी मदतीचाही समावेश आहे. पुणे ग्रँड टूरच्या दीर्घकालीन दृष्टीकोनाला मान्यता देत यूसीआयने या स्पर्धेच्या विकासासाठी आपली वचनबद्धता अधोरेखित केली.

पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे (सीएफआय) सरचिटणीस मनिंदर पाल सिंह आणि बजाज ऑटोचे संचालक अभिनव बिंद्रा यांचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाला यूसीआयचे अध्यक्ष डेव्हिड लॅपार्टिएंट यांनी इटलीतील लेक गार्डा येथे पीजीटीच्या आयोजनासंबंधी सादरीकरण करण्यासाठी निमंत्रित केले होते. या शिष्टमंडळाने जानेवारी २०२६ मध्ये यशस्वीरित्या पार पडलेल्या पुणे ग्रँड टूरच्या पहिल्या आवृत्तीचे आयोजन आणि भविष्यातील आराखडा यूसीआय व्यवस्थापन समितीसमोर सादर केला.

सादरीकरण आणि त्यानंतर झालेल्या चर्चेतील महत्त्वाच्या निष्कर्षांविषयी माहिती देताना जितेंद्र डुडी म्हणाले, “यूसीआय व्यवस्थापन समितीने स्पर्धेच्या गुणवत्ता आणि अंमलबजावणीचे कौतुक केलेच, शिवाय पुणे ग्रँड टूरला यूसीआय २.१ दर्जा देण्यास मान्यता दिली. हा स्पर्धेच्या आंतरराष्ट्रीय मान्यतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. तसेच २०२७ मधील स्पर्धा २६ जानेवारी ते ३१ जानेवारी या कालावधीत आयोजित करण्यासही समितीने संमती दिली आहे. त्यामुळे तीन राष्ट्रीय सुट्ट्यांचा समावेश करता येणार असून अंतिम वेळापत्रक निश्चित करण्याचा अधिकार पुणे जिल्हा प्रशासनाकडेच देण्यात आला आहे.”

## पोलीस पाटलांच्या सहकार्याने महिनाभराचा तपास एका दिवसात पूर्ण होऊ शकतो : माजी आमदार टेकवडे

**नीरा (दै. संध्या)**

गावपातळीवरील कायदा व सुव्यवस्था राखण्यात पोलीस पाटील हा अत्यंत महत्त्वाचा दुवा असून, पोलीस पाटलांनी पोलिसांना तपासकामात प्रभावी सहकार्य केल्यास महिनाभर चालणारा तपासदेखील एका दिवसात पूर्ण होऊ शकतो, असे म्हणत पुरंदरचे माजी आमदार अशोक टेकवडे यांनी गावापातळीवर असलेले पोलिस पटलांचे महत्व अधोरेखित केले.

पुरंदर तालुका पोलीस पाटील संघाच्या नूतन कार्यकारिणीच्या पदग्रहण सोहळ्यात ते बोलत होते. सासवड येथे हा सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पारपडला. यावेळी पोलीस पाटील संघाचे राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील यांच्या हस्ते नव्या कार्यकारिणीला मान्यता देण्यात आली व पदाधिकाऱ्यांना सनद प्रदान करण्यात आली.

यावेळी बोलताना अशोक टेकवडे यांनी पोलीस पाटील हा




गावपातळीवरील शासनाचा ‘डोळा आणि कान’ असल्याचे सांगितले. गावातील प्रत्येक घडामोडींची माहिती पोलीस पाटलांकडे असते. त्यामुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच गुन्ह्यांच्या तपासात पोलीस प्रशासनाला त्यांचे सहकार्य मोलाचे ठरते, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमात आमोल लोळे पाटील यांची अध्यक्षपदी, तर राहुल शिंदे पाटील आणि तानाजी काकडे पाटील यांची उपाध्यक्षपदी निवड जाहीर करण्यात आली. मावळते अध्यक्ष मोहन इंगळे पाटील यांची पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांनाही सनद प्रदान करण्यात आली.

माजी आमदार संजय जगताप यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करत पोलीस पाटलांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी आपण कायम सहकार्य करू, अशी ग्वाही दिली. तर राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे पाटील यांनी पोलीस पाटलांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता गावातील सर्वसामान्य नागरिकांवर अन्याय होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन केले. या कार्यक्रमास नायब तहसीलदार संदिप पाटील,सहाय्यक पोलिस निरीक्षक वैभव सोनवणे, जि.प. सदस्य हरिभाऊ लोळे, अजय इंगले,पंचायत समिती सभापती अमित झेंडे, उपासभापती प्रवीण जगताप,सदस्य स्मिता निगडे, पोलीस पाटील संघटनेचे दादा काळभोर पाटील,गोरखनाथ नवले पाटील, रोहिणी ताई हांडे पाटील, विनायकराव गायकवाड पाटील, विजयराव कुंजीर पाटील, उमेश तळेकर पाटील यांच्यासह राज्यभरातील पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने पोलीस पाटील उपस्थित होते.

